# अळुमाळु

(फुलांवरील काव्यसंग्रह - भाग १)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

अळुमाळु (फुलांवरील काव्यसंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. ८, शके १९४५,
रविवार, दि. १७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-962298-9-4

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण

या सृष्टीतील ज्ञात अज्ञात सर्व फुलांना
ही कृती सानंद समर्पित.

# मनोगत

फुलांच्या राज्यात सुगंधी वारे वाहत असतात. परिमळणारे क्षण, स्पर्शातली तलम रेशीम, रंगांची धुंदी, फुलपाखरं छंदी, कळ्यांचे गोड रूपडे, फुलांचे ताटवे, परागांच्या तुऱ्यांचे नटवे, सुरभित वातावरण या सगळ्यांचा मनावर इतका जादुई परिणाम होतो की आपलंच मन आपल्यासाठी नवखं होऊन जातं. आपणच आपल्या प्रेमात नव्यानं पडायला लागतो. जगण्यातली मजा क्षणोक्षणी येऊ लागते.

दु:ख कुठे जातात? भुर्रर्र ... उडून जातात कुठेतरी, जणू कधीच नव्हती ही दु:खं आपल्या मनात, क्षणात भुईवर स्वर्ग अवतरतो अन् नंदनवनीच्या सुखद क्षणांनी आपण हुरळून जातो. फुलांवर तर आपलं मन भाळतंच पण भाळलेल्या व्यक्तीसाठीही फुलंच मदत करतात.

जीवनातल्या सुखदु:खाच्या प्रसंगांना, भक्तीच्या, प्रेमाच्या भावनेला फुलांचं कोंदण मिळतं तेव्हा भावना अनमोल होतात. अळुमाळु नाजुकशा फुलांच्या सुरभीने जगण्याला सौरभपंख लाभतात. मग काय फुलं, फुलं अन् फुलंच मनात ठसून जातात. टवटवीत फुललेली असोत की सुकून जवळ जपून ठेवलेली. आठवणींच्या आठवणींना ते सोबत बाळगतात, म्हणूनच फुलं खूप जीवलग व आपलीशी वाटतात. खरंच ती आपली असतात...

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

बालवयात चित्रकलेचे प्रशिक्षण घेतले. राजा रविवर्मासारख्या महान चित्रकारांची चित्रे पाहिली. तरीही मला आजतागायत एकाही फुलाचे, फुल झाडाचे, वनस्पतीचे चित्र मनासारखे काढता आले नाही आणि रंगवताही आले नाही. बालपण जंगलात, माळावर रमण्यात गेलेले असूनही बालकवींच्या फुलराणी सारखे खेळता आले नाही. ही खंत मला आजही वाटत असते. वनस्पतींवर, म्हणजे गवतापासून वृक्षांपर्यंत, उमललेली फुले पाहताना ती फुले तोडून पुष्पपात्रांमध्ये ठेवायला माझे हात कधीही धजावले नाहीत. त्या मृदू, मुलायम, गंधहीन अथवा सुगंधी फुलांनी, फुलांच्या पाकळ्यांनी, ती कोमलता, तो गंध, ते चित्ताकर्षक आकार, कुठून, कधी, कसे शोधून एकत्र केले असतील, त्यासाठी त्या वनस्पतींची मुळे काळ्या मातीत किती खोलवर जाऊन अंधारात, चिखलात ही सामग्री गोळा करत, कष्ट करत राहिली असतील याचा विचार केला की मी भारावून जातो. फुलांकडे पाहताना मला मुळेही आठवतात. माणसाने फुलांचं अनुकरण करतच नाजूकपणा, सुगंध, चित्ताकर्षकपणा हे सारं शिकलं असावं. झाडांचा पुष्परुपी बहर ज्याला सुखावत नाही तो माणूस विरळाच. काळ्या पत्थरांच्या खळग्यात साचलेल्या मातीत आणि पाण्यात उमललेली फुलं मी पाहिली आहेत. डोंगळ्यांनी भरलेल्या सुरंगीच्या झाडावर फुललेली मादक सुगंधी फुलंही पाहिली आहेत. काटेरी पानांमधून सुरक्षितपणे उगवणारी केवड्याची कणसेही पाहिली आहेत. पण कोणत्याही फुलाला खुडण्याचे धैर्य मला आजवर झालं नाही. ती फुले जिथे आहेत तिथेच डोळा भरून पाहावीत, हुंगावीत, मनात साठवावीत हाच भाव माझ्या मनात, हृदयात आणि बुद्धीत आजही भरून राहिला आहे.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या कविता वाचताना आणि त्यातील शब्द मनात साठवताना मी आनंदलो आहे, गहिवरलो आहे, थरारलो आहे आणि क्वचित विव्हळलोही आहे. या कवितांच्या वाचकांना ही अनुभूती एकांतात, शांतपणे येईल याची मला खात्री आहे.

त्यांच्या कवितांमध्ये कधी प्रेमिका, कधी विरहिणी, कधी रसिका तर कधी गृहिणी हळूच डोकावते. फुलांमध्ये सुरंगी, अबोली, सोनचाफा, प्राजक्त, ओवळी (बकुळी), गुलाब, मोगरा, जाई, जुई, निर्गंध गोकर्ण, कर्दळी, झेंडू आणि असंख्य रंग अंगावरती मिरवणारी रानफुलेही आहेत.

पुस्तकातल्या शब्दरचनेमुळे कुठे कुठे पूर्वसुरींच्या हळुवार कविताही आठवतात.

उदाहरण द्यायचं झालं तर

एक प्रियकर प्रेयसीला म्हणतो,

**हसतेस किती ग गोड**
**प्राजक्तासम ते अजोड**
**लाजतेस प्रिये तू तशीच**
**नाजूक अन् ते स्वर्गीय**
**शब्द तुझा हळुवार**
**वाहे माधुर्याची धार**
**मी कठोर भुंगा तरीही**
**होतो अलगद हळुवार**
**ही प्राजक्ताची किमया**
**मी शिकार वारंवार**

हे स्वप्नरंजन जरी असलं तरी त्याला प्राजक्ताची पार्श्वभूमी आहे.

संपूर्ण संग्रह वाचल्यावर सुद्धा कवयित्रीच्या मनाचा ठाव लागत नाही; पण कुठेतरी हरवलेले, हरपलेले मन मात्र सामोरे येते. कवितासंग्रह वाचून रसिकांनी ही अनुभूती स्वत:च घ्यावी. एकाच बैठकीत वाचून संपवायचे हे पुस्तक नाही तर रोज एखाद दुसरी कविता वाचून त्या मागचे भाव रसिकांनी अनुभवावेत.

एक विचार मनात डोकावला की जर या कविता छंदात बांधल्या आणि सुरात गायल्या तर त्यांची लोकप्रिय गाणीही होतील.

ही फुलवंती.

ही फुलवंती.

इती लेखन सीमा.

**– प्रभाकर महादेव भातखंडे**

संस्कृत नाट्यलेखक, दिग्दर्शक, अभिनेते, मुंबई

# अनुक्रमणिका


१) तू गुलाबी गंधवेडी ... ९
२) कोमल हवी जातकुळी ... १०
३) या फुलांना काय झाले ... ११
४) अंगणातील ही अबोली... १२
५) मोगरीच्या फुलास ... १३
६) फुलून मोगरा सांगत आहे...१४
७) सुंदरतेला ना मर्यादा ... १६
८) सोनचाफी अभिलाषा ... १७
९) सुकेल बकुळी
कितीदा हासुनी ... १८
१०) सुगंधी सुरंगी ... १९
११) सुरभीचे ही गंध निधान... २०
१२) जाई न जाई कधीही ... २१
१३) हसले गोकर्ण ... २२
१४) परिमळ सुवर्ण चाफी ... २४
१५) प्रेमाचे किती
रूपक प्यारे ... २५
१६) स्वप्नं माझे उमलले ... २६
१७) या फुलांना सांग ना तू ... २७
१८) प्राजक्तंही हा
अवचित रडतो ... २८
१९) तू डोकाव
माझ्या मनात ... ३०
२०) त्या गुलाबाला कळावे
सोनचाफा व्हायचे ... ३१
२१) झेंडूचे मनमोहक कंद ... ३२
२२) मोगरा ... ३४
२३) प्रेम परीक्षा ... ३६
२४) बकुळ फुलासम
अबोल प्रीती ... ३७
२५) बकुळ ... ३८
२६) फुलांचे किती
प्रकार ... ३९
२७) सागाची दाटी ... ४०
२८) बोगनवेल ... ४२
२९) कर्दळ ... ४४
३०) घाणेरी ... ४५
३१) शांत चाफा ... ४६
३२) सायली सायली ... ४८
३३) साधीसुधी सदाफुली ... ५०
३४) इतुका हळवा
आणि गुलाबी ... ५१
३५) सोनटक्का ... ५२
३६) मधुमालती ... ५३
३७) सोनचाफा ... ५४
३८) फुले देखणी ही ... ५५
३९) प्राजक्ताचा सडा ... ५६
४०) गगनचुंबी बुचाची झाडे... ५७
४१) हसतेस किती गं गोड ... ५८
४२) हक्क कळीचा ... ५९
४३) कमाल निसर्गाची ... ६०
४४) हिरव्या पानी
बकुळफुलांची ... ६१
४५) लुसलुस चिंचेचा चिगोर... ६२

४६) रानजाई रानजाई ... ६३
४७) दारात चांदण्या गं ... ६४
४८) आम्ही तिघी मैत्रिणी
फुलराण्या ... ६६
४९) लालेलाल चाफेलाल ... ६७
५०) चिंब भिजले फूल वेडे ... ६८
५१) लिली ... ६९
५२) जगात ऐशी किती फुले... ७०
५३) ही फुले की पाने सुंदर ... ७१
५४) ही बुचाची फुले उमलली...७२
५५) आजी म्हणायची
गोकर्णाची ... ७३
५६) रे जास्वंदा ... ७४
५७) कर्दळ वाढे ... ७६
५८) फुलांचे संमेलन ... ७७
५९) शेवंती गं शेवंती ... ७८
६०) गवतफुलांशी
बोलून आले ... ८०
६१) ही नाजूकता
अशी दिसावी ... ८२
६२) खळखळून हसताच
कळीचे ... ८३
६३) बकुळी बापुडी ... ८४
६४) फूल वेगळे इथे जन्मते ... ८५
६५) कमलदले ... ८६
६६) फुलं भरल्या करंड्या ... ८८
६७) माझ्या अंगणी तारका ... ९०
६८) हिरवा चाफा ... ९१
६९) पानोपानी रंग हिरवा ... ९२
७०) ब्रह्मकमळ ... ९३
७१) गोड गोजिरे ... ९४
७२) पिवळा गुलाब ... ९५
७३) गर्द निळ्या
जांभळ्या फुलांची ... ९६
७४) फूल फुललंय दारी ... ९७
७५) फिक्या रंगांची शोभा ... ९८
७६) फुले कागदी ... ९९
७७) गोड सोनचाफा ...१००
७८) मोगरा असा फुलून
आला ...१०१
७९) गुलाबपाकळ्या
थाळी सजल्या ...१०२
८०) फुले अळुमाळू ...१०३
८१) देवपूजेची तयारी ...१०४
८२) वेगळ्या पाकळ्या ...१०५
८३) गंध केवड्याचा ...१०६
८४) बाग जांभळी गुलाबी ...१०७
८५) कदंब वृक्ष ...१०८
८६) कलश फुलांचा ...१०९
८७) नाजूकशी फुले ...११०
८८) कळ्या सकाळी
मोगऱ्याच्या ...१११
८९) जुईचा वेल ...११२
९१) प्राजक्ताचा सडा ...११४
९१) सूर्यविकासी कमळं ...११५
९२) मोगरा, जाईजुई वा ...११६
९३) सडे प्राजक्ताचे ...११८



## (१)
## तू गुलाबी गंधवेडी

गावरानी गुलाब होते
अंगणातून डोलणारे
गंधवेड्या जाणत्याला
मूकस्पर्शे बोलणारे

रोज ते फुलुनी यायचे
वाड्यामध्ये गावच्या
एक मुलगी थबकली अन
फूल भुलले रसिक त्या

हुंगुनी परिमळ ती थांबे
क्षण कधी क्षण दोन ती
आजही समरते मला
फूल जपणारी अशी

अंगणातील तो गुलाब
आजही पाहे की वाट
येईल कधी ती जवळी जी
पाहून जपतसे गंध थाट

नाही फुलला तो तसा
तीही ना आली अंगणी
ते तिचे असे थांबणे
त्या फुलांच्या कोंदणी

ये पुन्हा ये ना अशी
थांब त्या वेड्यासवे
ते फुलून येतील पुन्हा
आतुनी माझ्यासवे

तू गुलाबी गंधवेडी
भावना अलवार त्या
तू कुठे तो गुलाब कोठे
भावना हळुवार त्या

दि. ०५/०१/२०२१
रात्री ११.३२ वा.



## (२)
## कोमल हवी जातकुळी

ही बकुळी अशी कोसळली
दुःख कोणते तिला
कधी न बोलते तरीही हसते
सोसते ओझ्याला

किती नाजुकशी इवली इवली
मन कोमल कवळे
तरी कोणते दडपण साहे
रंग लेत सावळे

गंधखणी पसरून मंद परी
नाही गाजावाजा
शोभेचे अवडंबर नाही
तरी कसली तिज सजा

ती सोज्वळ साजूक नि सात्विक
मधुर गोड चित्ताची
इतरांच्या सुखदुःखामध्ये
विरघळण्या वृत्तीची

दूर कुठेतरी वनी काननी
उमलून पाहे वाट
यावा कुणीतरी मना जाणता
तिचा बकुळी थाट

किती प्रतीक्षा केली तियेने
कुणी न आले कधीही
थकुन गळून ती पडली तृणावर
सुकता गंध तनीही

आता वाटते गवतफुले ही
आली उगवून खाली
होतो सोहळा तिचा पायगुण
जिथे पोचते बकुळी

तिला जाणण्या समजून घेण्या
कोमल हवी जातकुळी
असा भेटावा जिवास जिवलग
मरूनही उमले बकुळी

दि. ०७/०१/२०२१
सायं. ०४.५१ वा.



## (३)
## या फुलांना काय झाले

या फुलांना काय झाले
रंग मिसळून अंग न्यारे
ही गुलाबी पुष्पराणी
केशराच्या राजसारे

मीलनाचे साक्षी वर्ण
एकमेका मिसळले जे
केशराच्या काठी पसरे
मंद वर्ण प्रेयसीचे

ती गुलाबी मल्मली तनु
अंगी लेपे केसरीपण
हास्य लाडिक लाज वेडी
पाकळीला कोवळेपण

एकरूपी होत जाता
रंग चढती चांदण्याचे
तू कधी मी मी कधी तू
सुमन होऊ अंगणाचे

प्रीतकलिका उमलली मग
दोन्ही रंगांची सुरेख
आत भिनल्या केसरावर
ही गुलाबी धुंदी देख

मन तुझे नि माझे भेटो
अगदी ऐसे रेशमीपण
मी कुठे? मुरले तुझ्यातच
तू कुठे? तर माझे मीपण

दि.२३/०१/२१
सकाळी ०५.१७ वा.



## (४)
## अंगणातील ही अबोली

अंगणातल्या अबोलीनेही
अबोली रंग टाकला
जराजरासी होत वेगळी
रंग सोनेरी माखला

ही अबोली बघ वेडी
वेगळी किती जाहली
थोडे बदलून गे स्वतःला
मोद रंगी नाहली

कोणा वाटली आज मोकळी
झाली ती किती बोलकी
दाद तुम्ही द्या रसिकहो
खुडावी हलकी हलकी

ती किती नाजूक सांगू
धाग्याने गुंफू नका
दोराही अलगद बोचतो तिज
सुईची टोचणी हवीच का

प्रेम देता अंगुलीने
सहज गुंतवू या तिला
तीही अडकून होई गजरा
गुंफुनी माळू तिला

तो जुना देई झुगारून
रंग एकंच बंध जो
अन नव्या रंगात पाहते
वेगळा जो ढंग तो

अंगणातील ही अबोली
आज खुलली हो किती
नाही शंका नाही हुरहूर
नाही कसली तिज भिती

आज झाली मोकळी ती
श्वास घेता मोकळे
रंग एकंच बंधनांचा
आज गंधही आगळे

दि.२८/०२/२१
रात्री १०.२३ वा.



## (५)
## मोगरीच्या फुलास

पाहून मोगरीच्या
हसऱ्या अशा फुलांस
का आठवे मला तो
आपुला असा प्रवास

ती भेट पहिलीवहिली
मी आणल्या कळ्या ज्या
ना कळते आजंही मज
तुज पाहता त्या फुलल्या

मग भेटलो कधीही
या मोगरीच्या साक्षी
प्रीतीत भरली नेहमी
आपुल्याच गंध नक्षी

ते वाट पाहणेही
असते न जीवघेणे
केलीच नित्य सोबत
गजऱ्यात मोगरीने

भेटींचा गंध चढला
नात्यात भाव भरला
आलो जवळ इतुके
जीवन संग ठरला

ती वेळ विवाहाची
केसात मोगरी ही
गेली फुलांसवे मग
लाजून नवरी ही

ती रात्र मीलनाची
शय्या भरून गेली
सुख चांदणे सुरम्य
मोगरीच ठरून गेली

ते क्षण असे सुगंधित
दरवळती आजही बघ
आयुष्य गंधभरले
ऋण केवढे तिचे बघ

जातोच आजंही हा
रुसवा तुझा तिच्याने
सोपे करून जाते
जगणे ती उमलण्याने

सहजीवनी सदैव
होती नि राहील ती
सुरभीत मन जीवन
नेहमीच पाहील ती

दि.०१/०३/२१
दुपारी १२.३७ वा.



## (६)
## फुलून मोगरा सांगत आहे

फुलून मोगरा सांगत आहे
ऋतू आला हा आला बहरा
ग्रीष्म सुरू हा होईल आणिक
वसंत येईल गोड साजरा

गंध मोहना घेत जीवनी
तप्त उन्हाळा सुसह्य होईल
कुणी कुठे जरी ताप देतसे
हाच मोगरा धावत येईल

रेंगाळून जाईल जीव हा
मन सुगंधित शीतल होईल
अंगणातला एक मोगरा
जगण्यासाठी अविचल होईल

कळी उगवता पहिलीवहिली
वारा पुलकित होऊन वाहील
आता पुन्हा हा परिमळ वाहून
ऋतुसवे तो धन्य गं होईल

एक कळी मज कानी बोले
मी फुलण्याला आले आले
फूल झाले की देवापायी
अन गजऱ्यातून खुलून गेले

कधी ओंजळीमध्ये नुसतेच
फुलं मोगरा भरून घ्यावे
अतुल्य ऐशा सुगंध राशी
कौतुकाने मग पहात रहावे

कधी आठवणी करुनी सुरभित
जन्मभराच्या आशा व्हाव्या
कधी मोगरा शोधत जाता
गंधाळून या दिशाच याव्या

आज उगवला पुन्हा मोगरा
तनमन अंगण फुलून आले
फुल उमलता रोपट्यावरी
भाव मनीचे खुलून आले

आला प्रियवर राजस गोंडस
प्रीतीचे ते अनुनय सालस
मीच जाहले गोड मोगरी
सुगंध भरले किती निरालस

दि.०४/०३/२१
सकाळी ११.३७ वा.



## (७)
## सुंदरतेला ना मर्यादा

सुंदरतेला ना मर्यादा
कल्पनाही कधी नसते शक्य
भूमीगत कांद्याचा फुलोरा
इतुका सुंदर असते शक्य

रुपावरूनी कधी गुणांची
कधी गुणांनी रुपाचीही
केली कल्पना पूर्ण भिन्नते
अनोखे दर्शन असेच घडते

त्याच्या कल्पना अनंत आदि
आपुले जीवन किती प्रमादी
जे कळते ते बिंदू एवढे
भ्रमता मात्र सागरा एवढी

पहा फुलुनी हा आला फुलांचा
अनुपम सुंदर डोल पिसारा
समानता ना कांद्यासंगे
परी कांद्याचा सूचक सारा

आपुल्यामध्ये असतो ऐसा
दडलेला लपलेला गुच्छ
त्याला फुलण्यासाठी मात्र
द्यावा मनोतल अगदी स्वच्छ

डवरून येऊन डोलू लागता
आनंदाला नुरेल सीमा
पाहुनी आपुल्या गुणगुल्माला
देहवृक्षही मोद तराना

रूप आपुले दिसे वेगळे
मग फळांचा घ्यावा भोगही
जरा वेगळे फुलून येऊन
सार्थक येथील जगणे जगही

दि.१०/०३/२१
सकाळी ०९.०२ वा.



## (८)
## सोनचाफी अभिलाषा

अशी फुले पाहून मनाला
येतो अवेळी बहार
उगा ऐकू ये कोकीळ कूजन
राग वसंत विहार

चाफ्यामध्ये किती वैविध्य
सोनचाफा सुरंग
दिसणे नसते तितके अमूल्य
मौलिक कर्मसुगंध

गंध दरवळे मंदमंदसा
नाजूक देह तलम
उंच वृक्ष कणखर केवढा
सुमन कोवळे मन

एक जरी हा हाती आला
जगणे होई सोने
सहज सुंदर सुरभित तनमन
गंधाळेल हे गाणे

किती आठवणी या चाफ्याशी
पिंगा घालून फिरती
स्थान सदैव असते याचे
सोज्वळतेमधे वरती

शांत अबोलसा धीरगंभीरही
उतावीळ तो नाही
जेही बोलतो हळुवार अलगद
मोरपिसारा काही

मूकपणाने सांगून जातो
सौंदर्याची भाषा
जन्मोजन्मी प्रीतफुला या
सोनचाफी अभिलाषा

दि.१८/०३/२१
सकाळी १०.४६ वा.



## (९)
## सुकेल बकुळी कितीदा हासुनी

मोहविती मज ही फुले गं
बकुळीची नाजूकशी
तुझ्या पापण्या उलगडती बघ
स्वप्ने तव कोमलशी

तुझे हास्य अलवार स्पर्श ते
ती लज्जा नयनातील
शब्दांविन ही सांगून जाते
बकुळी माझ्या मनातील

ती भेट आपली पहिलीवहिली
दोघांमध्ये हीच बकुळी
हिने घडविली भेट सुगंधित
गालांवरती हीच रुळली

तू लाजरी की फुले हिची ही
तलम नाती सांगून जाती
मजसी दिसती अदा तुझ्या ह्या
आजही जेंव्हा बकुळी हाती

इतकी नाजूक प्रीत आपुली
नाजूक माझी सखी सावळी
तूच शिकवली रीत मला ना
देऊन सारे आत पोकळी

दुःख गिळावे सुख अंथरूनी
फुलणे गळणे सडा टाकोनी
कदर कुणी जर करील खरी ती
सुकेल बकुळी कितीदा हासुनी

दि.०४/०४/२१
रात्री ०१.११ वा.



## (१०)
## सुगंधी सुरंगी

सुगंधी सुरंगीचा गजरा तू माळ
गंधात बुडवून तो घमघमाट

किती उंच हे कोकणातील झाड
टोकावरी त्याच्या उमलुन ग्वाड

नाजुक फुले हा बहर शेंड्यावरी
तोडून आणण्याची मेहनत खरी

किती कोश परिमळती अंगी हिच्या
किती गंध भरले अंतरंगी हिच्या

अति साजुल्या नाजुका या कळ्या
गजऱ्यात विणने हलक्या करा

ह्या रानसुरभीच्या मोहात जावे
सुकतील त्यांना अधिक सांभाळावे

कोकणची फुलराणी वेडी सुरंगी
दरवळ तिचा गजऱ्यातूनी दिशांनी

तिला पाहता कोकणा आठवावे
सुरंगीस हृदयातसे साठवावे

तिच्या आणि माझ्या प्रीतीत संगी
अशी गोड रंगाची गंधा सुरंगी

दि. १०/०४/२१
सकाळी ११.५७ वा.



## (११)
## सुरभीचे ही गंध निधान

हिरव्या पानांवरी लगडली
फुले जुईची छान
नाजूक कवळ्या गंध पाकळ्या
आसमंती कमान

गणिका अम्बष्ठा मुग्धी
सुचिमल्लिका नामाभिधान
सुरभित तनमन सुरभित अंगण
सुरभीचे ही गंध निधान

जाई मोठी बहीण हिची जणू
जुई नाजुकसे पुष्प लहान
उतरून आल्या लक्ख चांदण्या
वेलीवर लटकून सपान

गंध हुंगता जीव दंगतो
सांभाळू किती उन्मन प्राण
सख्या मनवाया काही नको मज
ओंजळभर तू जुईस आण

ती हसली की मीही हसते
अंगणी भरते मन फाया
देते तुजला सुख जुईचे
नाजूक सांभाळी तू प्रिया

दि.२७/०४/२१
रात्री ०६.४३ वा.



## (१२)
## जाई न जाई कधीही

जाई फुलांनी बहरून
गेली सुरेख बाई
त्या सात पाकळ्या अन
ती शुभ्र हास्ये काही

सुरभीचे चौघडे हे
आले निनादुनि हो
पसरून गंध गेला
आणिले खेचुनी हो

घरी दारी अंगणी या
अत्तर पसरले ना
तू भेटण्याचे मजला
सत्तर बहाणे पहा ना

घेऊन ओंजळीत
गजरा मी गुंफीयेला
तुज हाती माळताना
मजजवळी आणे तुजला

दिवसाच चांदण्यांनी
आभाळ माझे भरले
क्षण काही गंधवेडे
स्मृतिकोशी माझ्या उरले

ऋतू संपतो तरीही
जाई न जाई कधीही
माझे नि तिचे नाते
रेंगाळते अजूनही

दि.२४/०५/२१
सायं. ०६.२१ वा.



## (१३)
## हसले गोकर्ण

आज हसले गोकर्ण निळे ते
खुदकन निळसर गाली
हिरव्या पानांमधे मोरपिशी
प्रभा छान सांडली

आत दुधाळ्या रंगांची
साथ निळ्या वर्णाला
आकाराने चोरीयले की
गाईच्या कर्णाला

आत डोकवे उगाच वेडे
शिवलिंगाची आस
कुणी खुडेल का तोडून मजला
नेई शिवाच्या पास

स्पर्श रेशमी दडते पानी
फूल लाजरे थोडे
गंध न त्याला लौकिक काही
शिवपरिमळ मनी वाढे

वेल कोवळी नाजूक फांद्या
हिंदोळ्यावर कळ्या नि कळ्या
अलगद वारा मारून टिचकी
उमलून देतो फूल पाकळ्या

गालावरती खळी शोभते
फूल लाजते नाजूक फार
रंग माधवाचा हा अंगी
आराध्य हे शिवशंकर स्वार

कुणी पाखरू पाहते फुलांना
मिचमीच डोळे उघडून झाप
फूलंही रमे त्याच्या लाडिक
चाळ्यासंगे उगा अमाप

सृष्टीमध्ये प्रत्येकाचे
दैव वेगळे रूप बहार
कुठल्या फांदीवरी उगवणे
कुठे वाहणे जीव सुमार

तरी हसावे, उमलून यावे
वाऱ्यासंगे झुलून घ्यावे
ऊनपावसासंगे खेळत
शरदालाही अंगी ल्यावे

नकोच रडणे उगाच कुढणे
सुकणे पडणे असो खुशाल
पुन्हा नव्याने मातीमध्ये
रुजून उमलून यावे विशाल

दि. ०२/०१/२०२०
सकाळी ११.५४ वा.



## (१४)
## परिमळ सुवर्ण चाफी

हातात सोनचाफा
हृदयात आठे अंतरात
ती सोनप्रीत कवळी
आलेली ना भरात

केसात माळला मी
चाफा मनातला जो
तू धुंद होत गेली
तो भाव आतला जो

तो स्पर्श पहिलावहिला
शहारून अंग गेले
विरघळलो तेव्हा दोघे
चाफ्यास त्या कळाले

हसला नि जवळ केले
त्याने तुला मलाही
स्मरते ती भेट सुरभित
पाहताच चाफ्यालाही

मी आत आत घेतो
परिमळ सुवर्ण चाफी
आठवता भेट आपुली
येते तू बाहुपाशी

अधरांसी चुंबीण्याला
होतो अधीर मीही
लाजून चाफा चुर
क्षण मोहणारे काही

दि. ३०/०५/२१
सकाळी १०.३६ वा.



## (१५)
## प्रेमाचे किती रूपक प्यारे

किती दिसांचे प्रेम मनातुन
साठवून हा चाफा ठेवी
कोण बरे त्याची ही रमणी
शेजारीण बकुळी ही राणी

जरा लाजरा अजून बुजरा
चाफा शांतसा सोज्वळ आहे
कसे सांगावे गूज मनीचे
आतुरतेने वाट तो पाहे

तिकडे उगवून नाजूक राणी
बकुळीची बघ खुलली ती कळी
तीही अबोली किती लाजरी
शहारली पाकळी पाकळी

मुश्किल आहे परस्परांचे
प्रेम तयांना प्रकटित करणे
चाफा न्याहळत उगा बसतसे
फांदीवर तिज सदैव पाहणे

कळले कळले वाऱ्या कळले
प्रीतीचे ते फूल उमलले
एक झुळूक ती वाहून दोघा
अंगणी त्याने असे पाठवले

पडले पडले अलगद दोघे
वाऱ्यावरती उडले दोघे
पडता गिरकी घेऊन फिरकी
चाफा म्हणाला तू मन माझे

आता सांगतो मनातले तुज
तूच प्रिया मज संगिनी केवळ
करशील माझ्या भावफुलांचा
स्वीकार हे प्रेम पवित्र निव्वळ

अशी लाजली गाली ती तर
तरारून ते अंग फुलोरे
तिला मिळाले मनातले ते
प्रेम तिच्याही जे फुललेले

मन जुळले की जुळते सारे
नाते मग हे सुंदर न्यारे
चाफ्यासंगे बकुळीच्या या
प्रेमाचे किती रूपक प्यारे

दि.२१/०५/२१
सायं. ०७.४३ वा.




## (१६)
## स्वप्नं माझे उमलले

या घराच्या भोवताली
स्वप्नं माझे उमलले
रंग सारे पांघरुनी ते
फूल होऊनी डोलले

ही सुखाची थंड हिरवळ
दाटली सभोताली की
आणि सौख्याची हरित
वनराई पसरून गेली जी

झुळुझुळु वाहे प्रवाह
गीत गाऊन अंगणी
कस्तुरीचा गंध वाहे
सुरभी काही चंदनी

या फुलांच्या गुल्म दाटी
रंगी रंगुन बोलती
गुज माझे एकमेकींच्या
मनी जणु सांगती

हे झरोके या घराचे
मोकळे किती मोकळे
दिलखुलास हे सांगती ना
सृष्टीनाते आगळे

हा विसावा हा दिलासा
देह मन रमते इथे
घरकुलाच्या कोंदणातून
जन्म रेंगाळे इथे

दि.३०/०१/२१
रात्री ०९.११ वा.




## (१७)
## या फुलांना सांग ना तू

या फुलांना सांग ना तू
सारखे हासू नका
मन वळवून ते तुझ्यासम
लाजेने वाकू नका

एकतर तो स्पर्श तलमी
मऊमऊ तुझाच ना
तू चिडलेला रंग गाली
पाकळीवर तोच ना

मी तुझा अनुनय करण्या
आलो जवळी की जशी
दृष्टीला मुरडून तेव्हा
दूर तू हलकेच होशी

ही फुलेही अगदी तैसे
भृंग्याला छळतात की
तो करी गुंजन परी
वाऱ्यासवे वळतात की

हाती धरता वाटते मज
हा तुझा मुखडा जणू
तेज ओसंडून वाहे
आणि पुलकित ती तनु

पापण्याही नयन दोन्ही
अधर वाटती पाकळ्या
ते तुझे करतल मृदुल अन
भाव कलिका भासल्या

सांग ना वेड्या फुलांना
का असे डुलता तुम्ही
अगदी माझ्या प्रियतमेच्या
सारखे खुलता तुम्ही

पाहता यांना सदैव
आठवांची दाटुली
जीव कासावीस माझा
होत नाही भेटुली

असू दे पण राहू दे राणी
यांनी सोबती राहणे
तू जरी ना भेटू शकली
तुज फुलातच पाहणे

दि.०६/०२/२१
सकाळी ११.०० वा.



## (१८)
## प्राजक्तंही हा अवचित रडतो

ओठांवरती हासू माझ्या
ओसंडून जे येते
अर्थ असा नाही की मी
खरी आनंदी असते

आत वाहते गुप्त सरिता
किती दु:खे भरलेली
परी ओठांवर फुलते माझ्या
निखळ हास्याची वेली

डोळ्यांमधले भाव बोलके
परी ते सारे मुरले अभिनेते
कधीतरी मग विराण शांत
नयन व्यथांना सांगताते

पहा वाचता आले तर तुज
गभीर दु:ख हे माझे सारे
हसण्यामधले मोती माझे
दडविती आतल्या सर्व त्रासा रे

आत वेदना बोचून जाती
शल्य मर्माचे सांगू किती
आपला जो म्हणून आला
दिली दु:खाची अशी शिदोरी

याला त्याला प्रत्येकाला
समजू नये मज सखोल घाला
म्हणून माझ्या वेदनेचा मी
गोंडस प्राजक्त हा केला

मूकपणे तो फुलतो हसतो
घोट गिळुनिया गळुनी पडतो
कधी कुणाला कळते का हो
प्राजक्तंही हा अवचित रडतो

भाव जाणता विरळा असतो
नवनीताचे हृदय बांधतो
असा कुणी तो साथी मिळण्या
कधी जन्म मरणाला सांधतो

असू दे वरती हास्य पेरले
उरात तम किती गडद ते उरले
माझे दुःख ना कधीच सरले
वर गोंडस मग मोद पसरले

कुणी काढली प्रतिमा माझी
हसरी गोजिरी आणि साजिरी
मीही त्यातच निजप्रतिबिंबा
पाहून रमते वेडी आजही

दि. २०/०५/२१
सायं. ०७.४६ वा.



## (१९)
## तू डोकाव माझ्या मनात

सोनउन्हात डोलणारी
आज कर्दळी बोलली काही
लालचुटुक रंग असूनी
लक्ष कोणाचं का येत नाही

मी खुलते फुलते दाराशी
तरी का प्रेमाला उपाशी
दुरून गुलाब आणशी
दिसे ना तुला ही उदासी

सोहळे साजरे घरी
उत्सव दारी मंदिरी
पानाच्या नशिबी नैवेद्य
उमलूनीही मी दूरी

कधीतरी ये प्रेमाने
कोमलसे स्पर्श माझे
ना गंध वाटे तुला की
अंगण नशीब माझे

उंबरा ओलांडुनी मी
येईल कधी सदनी
कर्दळी कोमेजते रे
बोचुनी स्वतःस मनी

ने एकदा रे एकदाच
हातात घेऊन हात
देईन सुगंध सारे
तू डोकाव माझ्या मनात

दि.१२/०६/२१
रात्री ०१.०० वा.





## (२०)
## त्या गुलाबाला कळावे सोनचाफा व्हायचे

त्या गुलाबाला कळावे सोनचाफा व्हायचे
शांतपणे उमलून उंच प्रीतगंधी न्हायचे

आधी तो होता उथळसा धुंदीमध्ये ऱ्हायचा
रंगरूपा चाखण्याला देहामागे जायचा

एकदा केंव्हातरी त्या भेटली सखी चंदनी
ती कधी त्या भेटलेली त्याच्या आपुल्या अंगणी

ना कळे कोणास काही भाग्य कोठे साथ रे
चालुनी किती अंतरे, काही रिकामी अंतरे

अंगणातून गंध जरी पसरे गुलाबी गोडसर
काही रिकामे वाटते परी भरले दिसते वरवर

कोठुनी मिळते तयाला रातराणी सोशिका
त्या उनाड गुलाबमनीही संयमी सोनचाफिका

काय झाले त्या गुलाबा हुंगण्या जो रंगला
घेणे नाही देणे कळले सोनचाफी दंगला

रातराणी चंदनाची वाट परिमळण्या झुरे
सोनचाफा होत गेला तो गुलाब आता नुरे

दि. ०६/०२/२१
रात्री १२.०२ वा.



## (२१)
## झेंडूचे मनमोहक कंद

डौलदार गोल गोल झेंडूचे
मनमोहक हे कंद
नाही कशाचा, सणासुदीचा
झेंडूला हो छंद, झेंडूला हो छंद

जिथे सुखाची येई आरोळी
झेंडूचे हो तोरण दारी
पाहताच हे हसरे फूल
मन होतसे खुशाल मूल
ते तिथेच दंऽऽग, ते तिथेच दंऽऽग

नाही कशाचा, सणासुदीचा
झेंडूला हो छंद, झेंडूला हो छंद

गेंद केशरी भगवे छान
पिवळेधमक बिंब लहान
खुडा पाकळी एकूण एक
आत बसलंय खोबरं सुरेख
बालपणी ते खाण्याचा चंग

नाही कशाचा, सणासुदीचा
झेंडूला हो छंद, झेंडूला हो छंद

झेंडूफुलांची मैत्री छान
आम्रतरुची पाने सान
हिरव्या केशरी पिवळ्या ऐशा
रंगसंगतींची ही कमान
त्या कमानीखालून या स्वच्छंद

नाही कशाचा, सणासुदीचा
झेंडूला हो छंद, झेंडूला हो छंद

चारमासी हे जगते झाड
फूलपाखरे येती द्वाड
रानीवनी, अंगणीही फुलतो
सोन्याचा नाजूक संसार
या संसाराचा लाडिक रंग

नाही कशाचा, सणासुदीचा
झेंडूला हो छंद, झेंडूला हो छंद

झेंडू पाहता नयनी दसरा
वाहनांवरी माळा हसऱ्या
दिवाळीसाठी तो सजतो
गाली खळी अन तो लाजतो
पक्वान्नांचा येई सुगंध

नाही कशाचा, सणासुदीचा
झेंडूला हो छंद, झेंडूला हो छंद

माझ्या मनीच्या कोपऱ्यामधे
फूल एक झेंडूचे राहते
आयुष्याला उत्सव करुनी
ते डोळ्यामध्ये सुख पाहते
दिसतो त्याला तिथे आत्मानंद

नाही कशाचा, सणासुदीचा
झेंडूला हो छंद, झेंडूला हो छंद

दि. १०/१०/१९
दुपारी ४.५७ वा.



(२२)
**मोगरा**

एक मोगरा फुलतो
माझ्या मनाच्या अंगणी
कळी उमलते जशी
जीवनाच्या या रांजणी
याचा गंधची वेगळा
नासिकेत प्रवेशतो
अंतराला गंधाळून
साऱ्या शरीरी घुमतो
शरीराचा रोम रोम
गंधाने पुलकित
अंतःकरणाचे भाव
होती मोगऱ्याने धुंद

भाव किती हे निराळे
मोगराच की जाणतो
कधी भक्ती जागवून
मला देवापायी नेतो
हे जीवनची देवा
व्हावा सुगंधी मोगरा
गंध देता देता सुके
तरी क्षण सुगंधी साजरा

मोगऱ्याची फुलं हाती
ओंजळ भरतात
बाळ राजांच्या गालाशी
पिंगाही घालतात
बाळ धुंद श्वास
घेऊन जाणे गंध
बाळबोध या ज्ञानात
भर घाली हा सुगंध

पाहताच हा मोगरा
सय माझ्या त्या सखीची
जाणीव नाही कोणा
ती आस जीवनाची
केसांमध्ये तिच्या रुळे
मोगरी गजरा
चंद्रमुखी प्रेयसीचा
मुखचंद्र गे लाजरा

कधी पट पाहताना
आयुष्याच्या सांजवेळी
सखी पत्नी साजणीस
सय येते एक कळी
उगा हिरमुसे मनी
मी नाही आता तशी
मी म्हणतो प्रियेला
त्या कळीसाठी राणी
तू आजही जशीच्या तशी

एक मोगरा मनात
होता की फुललेला
न ठाऊक जगाला
हा जीव झुललेला
आजही झुरतो मी
मोगऱ्या गंधकोशी
न प्रकटले प्रेम
अबोल मोगऱ्याशी
भावना ही ताजी करे
स्मृतिगंध दरवळे
क्षण आठवून ते ते
मन विरही होरपळे
किती फुलले मोगरे
तो मोगरा न फुले
ताटव्यांच्या मध्ये
मन माझे गलबले

ती हसली एकदा
मी मोगरा जाहलो
ती डोकावी मनात
मी अजून फुलतो
माझ्या मनातली
ती मोगऱ्याची कुपी
मी अत्तर सांडतो
कुणा न कळे कधी

ती भेटली एकदा
क्षण मोगरी गजरा
गंध बहाल करिती
आमुच्या तेव्हा नजरा
ती म्हणे मन माझे
भुईचा घेई वसा
फुलविण्या तुला
क्षण नाही म्हणू कसा
मीच प्रकटले
गंधातुनी तुझ्या
तू शोधिशी मला रे
मी शोधताहे तुला

मातीतून गंध जो
मोगऱ्याला जाई
मोगराही पुन्हा
गंध मातीसाठी होई

दि. २१/१२,
दुपारी १:११



## (२३)
## प्रेम परीक्षा

ही अबोली, मन बकुली
आतून धुमसत आहे
कसे बोलावे कसे सांगावे
शब्दा गवसत आहे

शब्द तिच्या त्या दिव्य भावना
कधी न प्रकटु शकतील
तिच्या मनातील राजकुमारा
कसे ते भेटू शकतील

मग अबोली लाजून गाली
नेत्रातून पसरली
आणि बकुळी तिच्या भावना
होऊन सारे विसरली

भांबावून ते गेले शब्द
कसले नाते जुळले
आम्ही असे ना सखोल प्रेमा
आधी कधी पाहिले

आता तिच्या त्या झुकल्या नजरा
सारे बोलून जाती
तिच्या मल्मली स्पर्शासाठी
रुळून तिजवर जाती

दि.२०/०१/२१
रात्री १०.२५ वा.



## (२४)
## बकुळ फुलासम अबोल प्रीती

बकुळ फुलासम अबोल प्रीती
प्रिया तुला कळलीच नाही
भावफुलांचा सडा टाकला
तरीही तुला मी वळलीच नाही

जीव इवलुसा असला तरीही
गंध वेगळा मधुर जरा
नाजूकतेचा घेत वसा तव
पदी सडा हा ध्यास खरा

नाजूक कवळ्या लंब पाकळ्या
मधे सुरभीचे कोशघडे
जगास चोरून तुझ्याच कानी
मज प्रीतीचे झडती चौघडे

तू येशील, मज कवेत घेशील
ओंजळीतूनि भरताना
इतके देईन तुला सख्या की
नयन ओले मज स्मरताना

किती फुलांचा परिमळ हुंगून
हुरहूर राहील तुझ्या मना
एक बकुळी, वेडी अन खुळी
अव्हेरली तू जाताना
अव्हेरली तू जाताना

दि.१/७/१९
रात्री १०.४४ वा.



## (२५)
## बकुळ

बकुळ कशी लगडली
अबोलशी बडबडली
स्वप्नं तिचे पहाटेचे
का उगा ती गडबडली

कोण तिच्या स्वप्नी आला
गंध हुंगुनिया गेला
छंद काही जिवा जडे
तोच दिसू लागे तिला

हरवली हरवली
प्रेम ल्येत मिरवली
एक कथा जीवनाची
पक्की तिने ठरवली

येणे जाणे त्याचे नित्य
तिला त्याचे कितीअगत्य
वाट पाहुनिया वेडी
थकत नसे हेचि सत्य

सोनसळी रंगाचा
सोनचाफा सोन्याचा
सजन मनी ठसलेला
मंद गंध गुणाचा

हसली हसली बकुळी
फुलली उरली ना कळी
मनाजोगा प्रियतम तो
शहारली पाकळी पाकळी

दि.०४/०४/२०२२
रात्री ०९.४२ वा.



## (२६)
## फुलांचे किती प्रकार प्रकार

फुलांचे किती प्रकार प्रकार
निर्मिण्याचा सुविचार
गोंडस हळुवार
भावनांचा आविष्कार

पाकळीचे स्पर्श ऐसे
मल्मलीचे ते गालिचे
गाली रूळते कधी ते
पुष्प पुष्पा भाळलेले

वनी ताटवे ताटवे
उद्याने फुललेली
घरी कुंडीतून कुठे
फुलं वेडी हासलेली

काही फुलांशी हे नाते
वेगळेच जडलेले
जड हृदयात त्यांनी
खेळ गोड मांडलेले

कळी होते हळु फूल
एक सुवास अबोल
उमलता भाववेडे
लाजणारे ते कपोल

दव सजतील कधी
पाकळीच्या अंगावर
माळ मोत्यांची लेवून
तिचे रूप खुलणार

वाट पाहत राहते
फूल वेडे रसिकाची
ज्यास कोमलता ठावे
कला फुला जाणण्याची

दि. १८/९/१९
सकाळी ६.४१ वा.



(२७)
## सागाची दाटी

रानाच्या कुशीत
सागाची दाटी
आकाशी झेपावे
एवढी छाती

उंची उंची याची
गगना भेदी
लाकूड ऐसे
जीवन वेधी

घरादाराचे
आयुष्य दीर्घ
सागवान उभा
काळ प्रदीर्घ

रानात कोठे
निर्जन स्थळी
सागवानाची
भरात नवाळी

बहर फुलांचा
रजतकोशी
नाजूक कोणी
काढिली नक्षी

मोठमोठ्या
हिरव्या पानावर
फुलांचे तुरे
मुकुट ठरे

झाड सागाचे
वनसम्राट
कार्यही त्याचे
तसे विराट

फुले फुलती
कोण पाहती
लाजून अळुमाळू
एकांती राहती

साग बहरे
मोहोर अंगी
चांदीची चोळी
श्रीमंती सांगी

नटूनथटून
वनदेवी की
वाट पाहते
राजस राणी

फुलांचे अंग
कशिद्या संग
भरजरी शालू
सागाचा ढंग

जसा टिकतो
साग शतके
फुलांचा बहर
देख हटके

रानाचे सौंदर्य
सागफुलें
जाळी जाळी
वाऱ्यासंग डुले

चला पाहू या
सागफुलांना
मदन हासवी
इथे कळ्यांना

सागवाना तू
फुलत राहावा
वंश वाढून
फळत राहावा

घरे आमुची
भक्कम करीशी
नाजूक फुलांचे
भविष्य होशी

दि.३/१०/१९
रात्री ११.४३ वा.



## (२८)
## बोगनवेल

बोगनवेल ना गंध ना वास
रंग सुरेख नाही सुवास
वांझेचं दुःख भोगते वेडी
पोटाला फुलं परी गंध ना जोडी

फूल पांढरे नाजुक खरे
भोवती रंगीत सुंदर दळे
मनात असेल दुःख केवढे
तरी हासती रंगीत फुले

बोगनवेल ती फुले कागदी
मऊ पातळ तलम पाकळी
फांदीचे काटे वेलीस आधार
पाझरे काळीज कातळशार

सदाहरित बोगनवेल
पांढरी फुले कंटाळ्यादार
गुलाबी, किरमिजी, लाल, जांभळी
केशरी, पांढरी आणि पिवळी

चमकदार किती कंटाळ्या
तरारती फुलं अन पाकळ्या
अंगानी फुलून जाडसर होत
सजावटीला शोभा आणीत

शुष्क मौसम बोगन राही
फुलांचा बहर ती पर्णपाती
फुलून येतं छोटंसं फूल
पानांची भोवती पडलीय भूल

फुले किती पोटी, रंग सुरेख
गुणांचा सुवास येईल त्यांस
रूप देखणे मानून पुरे
बोगनवेल सांभाळी फुले

फुलांचा बहर, देखती नजर
थबकती जन क्षण दोन क्षण
नसू दे वास, नसो सुवास
फुलं देखणी, हीच आरास

जीवन असंच आहे बाबांनो
सारं कसं मिळेल साऱ्यांना
कोणास काही, कोणास काही
दिलंय देवानं अमूल्य पाही

जेही मिळालं सुंदर आहे
मधुर समजून सुखात राहे
नाही त्याचा रे कशाला सोस
आहे ते जपावे, सुखे भरघोस

बोगनवेल सांगते ऐका
सारे हवे हा सोडू या हेका
आहे हे सारे, सुंदर नाही का
गोडवा त्यातंच चाखू बरं का

दि.३/१०/१९
सायं ६.२७ वा.



## (२९)
## कर्दळ

कर्दळ वाढे, वाढे दाराशी
परसदारी वा अंगणी उभीशी
थोडी लाजिरी, थोडी बावरी
पानांच्या घोळक्यात कोंब साजिरी

कळ्या कळ्या, गोऱ्या उंचपुऱ्या
उमलू पाहती भराभरा
फुलांचे सोहळे किती टिपावे
कर्दळीत चित्र असे दिसावे

रंग आगळे, रंग वेगळे
पानात तिच्या नैवेद्य साजे
कर्दळ वेडी मान ना पान
बनून राहते बिचारी सान

तिच्याने वाढे किती हिरवाई
डोळ्यास दिलासा ताजी नवलाई
फुलांना गंध नाहीच तिच्या
रंग आकारे लोभस भाषा

गावाच्या घरी, कर्दळ दारी
हाताशी तिची पाने सहजी
सोबत तिची सखीसारखी
गरज दिसता धावत राही

वेळ न दिला, पाणी न दिले
तरी वाढते प्रेमभराने
ताजी पोपटी हिरवी पाने
फुलांची टोकाला बांधून तोरणे

सोशिक कर्दळ, स्मृतींची वर्दळ
कर्दळीवनात स्वामींचा दरवळ
तिथेच तिच्याऽऽऽ राहिले वनी
आत्मी तिच्या सामावले हो स्वामी

योग्याचा रंग संन्यस्त फुले
लाल केशरी मस्तकी टिळे
स्वामी स्वामी बोले मनी कर्दळी
रोजची ती आज भासे वेगळी

दि. ४/१०/१९
रात्री ११.२१ वा.



## (३०)
## घाणेरी

जे जे दिसते अतिशय सुंदर
हितकारक ते असेल का
विचार करुनी सखोल पाही
सांगे तत्त्व घाणेरी बाई

दिसते कोणी स्वरूप सुंदर
मन विषारी असते ना
होत्याचे नव्हते करे सुंदरी
सांगते ऐका टणटणी बाई

फुले घाणेरी रंगीबेरंगी
गुच्छच गुच्छ डोलत राही
फळे पोपटी जांभुळरंगी
रोग विषारी देत जाती

विदेशातुनी आली घाणेरी
स्वदेशी झाडा बनली काळ
पसर पसरते गिळून टाकते
इथल्या मूळ अशा झुडुपाळ

किती थांबवा वाढत जाते
वनौषधींना नष्ट ती करते
फुले देखणी मिरवीत राही
उग्र दर्पही सोबत घेई

हिरवट बसकट झाड ठेंगणे
खरखरीत ती चरबट पाने
फांद्या काटेरी सडसडीत
संरचनेने फुले आघाडीत

फूलफुलोरा मनास मोही
हिरवी कच्ची फळे विषारी
उष्णतेत घाणेरी बहरे
शोभेसाठी कुंपण व्हा रे

श्वेत नारिंगी पिवळी जांभळी
लालगुलाबी फुले गोडुली
गुच्छ तयांचे मोह पाडती
फळे विषारी जीवास नडती

झुडूप रानटी कुंपण झाले
घराबाहेरी सजून बसले
विदेशातुनी आणून चुकणे
आता वाढणे हिचे न थांबणे

म्हणून विचारे रुजवावे
झाड, विचारा अथवा माणसा
स्वीकारता अविचारे एकदा
सहजासहजी नसे हो सुटका

म्हणून वरपांगी न भुलावे
घाणेरीला आठवत जावे
फळे विषारी पसरू नये ना
संयम ठेऊन सौंदर्या पहावे

दि.३/१०/१९
दुपारी १.५५ वा.



## (३१)
## शांत चाफा

आज असा शांत शांत
गप्प गप्प का बरे
उमलुनी उगा उदास
चाफा फांदीवर खरे

वारा आला हलवुनी
जरा जरा गेला
चाफा काही जागचा
हलेना डुलेना

आज उन्ह झेलीत उगा
चाफा गोरामोरा
गरमी झेलून पाकळ्याही
झाल्या की सावळ्या

पानं सारी गोंधळली
आक्रीत काय झालं
हसणाऱ्या डुलणाऱ्या
फुलांनी मौन प्यालं

झाडंही झालं पुरंच वेडं
त्याला काहीच उमजना
फुलांना काय मधेच झालं
काही काहीच समजना

फुलं बिचारी गर्क विचारी
कुणकुण त्यांच्या आलीया कानी
जागा विकली मालकानी ती
चाफ्याचं अंगण उदासवाणी

बैठक पक्की आत्ताच झाली
खिडकीतून ती त्यांनी पाहिली
नवा मालक लगे म्हणाला
पाडून सगळं बांधीन नव्याला

झाड चाफ्याचं अडसर होईल
उगाच जागा वाया ती जाईल
सगळ्यात आधी चाफा हटवू
घरात शोभेची झाडे नटवू

नाईलाज काही जुन्या धन्याचा
चेहरा होता बोलत त्याचा
ओशाळला मनी हात जोडुनी
चाफ्यास बोलला मौनातुनी

तेच मौन आज फुलांनी बघा
अंगाखांद्यावर घेऊन उगा
आठवण या घरादाराची
मालक आणि राजकन्येची

गाल फुगवुनी सखी रडली
झाड माझे नका विकू म्हणाली
विकले घर तरी चाफ्याचे दार
तसेच ठेऊ उरी जन्मभरी

तिची आसवे चाफ्याच्या उरी
उरात तिच्या चाफ्याच्या चरी
प्रेम तिचे इतके पाहुनी
मराया चाफा मौनाने दारी

आज शांत तो आत बाहेरी
बालपणीची सखी बावरी
फुले नि सखी कावरीबावरी
पुरून उरेल प्रेमशिदोरी

चाफ्याच्या घरी, चाफ्याच्या दारी
चाफाच उरी चाफा अंतरी

दि.१/१०/१९
रात्री ११.३७ वा.



## (३२)
## सायली सायली

सायली सायली
नाजूक राणी
पाकळ्या कवळ्या
रातीला गाणी

सायंकाळी ही
उमले सायली
गंध रात्रभर
टोपली टोपली

शुभ्र कळ्या तिच्या
फुलेही धवल
सृष्टीचे सुंदर
गोंडस नवल

परिमळ गडद
श्वासात भरे
सायली संगे
अंगण स्मरे

माझ्या माहेराची
सय सायली
कुंपण झालेली
वेल सायली

तिची नि माझी
नाजूक गट्टी
तिच्यासाठी मी
आजही हट्टी

पाहून तिला
रडणे पळे
हास्याचे फवारे
जिणे आकळे

सायली तुझा
गंध उरात
हळवे भाव
येती भरात

हसण्याची तू
स्मितभाषा गं
निष्पाप भावना
तुझ्या मनात

गाली तू माझ्या
रुळत होती
कळी कळी तुझी
हातात होती

आजही माझी
अंजली पाहे
सायलीची वाट
उरात राहे

ते माहेर, ते
अंगण माझे
देवाच्या परडीत
सजणे तुझे

कशी विसरू
सायली तुला
माहेर झालीस
आजघडीला

दि.१/१०/१९
सकाळी ७.११ वा.



## (३३)
## साधीसुधी सदाफुली

साधीसुधी सदाफुली
जरा हिरमुसली
नेहमीच फुलूनिया
उदास ती बसली

सारी फुले ऋतू येता
फुलतात तेवढी
मी सदा फुलते नि
हसते की केवढी

गंध माझा वेगळा
साधा रुपसोहळा
पाच पाकळ्यात
भरे नित्यनेम आगळा

सदैव मी फुलते
कोण मला पाही
रोज रोज फुलते
कोणी लक्ष देत नाही

साऱ्या साऱ्या फुलांवर
फुलपाखरी गराडा
फिरके ना कधी जरी
पायी टाकला मी सडा

आज आले की पाखरू
पिवळे फिकट गोजिरे
माझा गंध शोषताना
गाल पाकळी लाजरे

फुलणे फुलणे मला
फुलणे माहीत
इथे येत जारे तुही
घेत मलाही कवेत

सदाफुली आनंदली
बघ अलगद स्पर्शी
मध होऊन वाहते
नस नस रसरशी

दि.२०/८/१९
दुपारी ३.४० वा.



## (३४)
## इतुका हळवा आणि गुलाबी

इतुका हळवा आणि गुलाबी
होशील का रे सखया
याच फुलांच्या सवे स्वभावा
तलमशील का सखया

अशा पाकळ्या तव हृदयीच्या
खुलूनिया येऊ दे
बिंब मला ते नाजुकसे रे
आत तुझ्या पाहू दे

प्रीत परागा उमलू दे ना
मीलन होईल ऐसे
नको राग अन नको दुरावा
सुमन मन हे ऐसे

अशी येऊ दे झुळूक सुखाची
आनंदाने डोलू
मूकपणाने भाव मनीचे
कळी पाकळी बोलू

रंग न बदलो तुझा कधीही
मजला तू सांभाळ
अंतःकरणी निज प्रेमाचा
करीशी रे प्रतिपाळ

असू नसू दे बहर कधीही
तू बहराला यावा
कवेत या तव अनुरागाच्या
धुंद वसंता घ्यावा

प्रकाश मिळू दे, मिळू दे पवन
मधुर चालू दे गुंजन
हळुवार या तुझ्या नादी मी
मदनाला अभिवंदन

शिशिर आला तरी भाव न गळू दे
जागा उमलते पुन्हा
तुला वाटतो तर मी करते
प्रेमाचा हा गुन्हा

काही नको मज, फूल तू व्हावे
नाजूक भावफुलोरा
जाणून मजला घेशील वेड्या
प्रतिसादाचा दुजोरा

दि.१४/०३/२१
सकाळी०८.०६ वा.



## (३५)
## सोनटक्का

किती सांगावं, किती बोलावं
सोनटक्क्याचं काळीज व्हावं
गंध देऊनी सुकुनी जाता
स्वप्न आभाळी फुलून यावं

शुभ्र एवढं चांदणवर्ण
तलम एवढं अंतःकरण
कोमलतेच्या सीमापार
दर्पण जैसे आरपार

नाजूकतेची नाजूक धार
सोनटक्क्याने केली पार
हात कसा मी लाऊ त्याला
अलगद त्याची रेशीम फार

ओल मिळावी वर्षावाची
खुले कळी ती आपसुक त्याची
थंड हिवाळा जपतो त्याला
ग्रीष्म वैरी हा जन्मोजन्मी

सायंकाळी खुले खुशाल
मध्यरात्रीला पूर्ण बहार
नाजूक टक्का सकाळी धस्का
सुकून प्रभाती जीव उधार

पातळ पातळ कवळ्याशार
तीन पाकळ्या श्वेतखुमार
मधे सोनेरी परागपिशवी
जपून ठेवतो जीवापाड

रंग एवढा धवलस्वच्छ की
हात लावण्या कचरे मन
फूल फुलूनिया दिसते जैसे
फुलपाखरू ते तनमन

ललना कोणी श्रमातिरिके
अथवा रुसुनी कोमेजते
उपमा तिजला याच फुलाची
कविमनालाऽऽऽ उमजते

सुगंधी द्रव्ये या गंधाने
सौंदर्याच्या उटी तैय्यार
औषध होते कधी फूल हे
नाजूक हळवी कुसुमनार

फुले हाताळू नका हो कोणी
सुकतील नाजूक अति अलवार
म्हणून कळ्यांचा फुलण्याआधी
विकण्या स्वत: भरे बाजार

दालन प्रासादातून याचा
गंध अलौकिक दरवळतो
प्रसन्न सुवास गाभाऱ्यासम
ईश जीवाला जणू कळतो

दि.२७/९/१९
रात्री १२.२९ वा.



## (३६)
## मधुमालती

मधुमालती गंधित पुष्पवने
लोभस रंगीत ती कुसुममने
गुच्छगालीचे विणले कोणी
रम्य कशिदा हिरव्या पानी

रोज सकाळी रंग बदलते
शुभ्र आधी मग गुलाबी होते
तिसऱ्या दिवशी लालचुटूक
छटा वेगळी शोभे खूप

गंध सुगंध मोहक वेडा
मधुमालती भवती गराडा
गुंजन पक्षी होऊन गोळा
मधमाश्यांनी मधु शोधीला

मधुघटांनी ओसंडून ती
गंध पसरवीत रंग बदलते
गृहशोभा वा सजावटीला
गुच्छ देऊनी अतीव खुलते

बारमाही जरी बहरा येई
ग्रीष्मातुन ती डोलून जाई
भाद्रपदातील गणपती पूजनी
पत्री तियेची मान घेई

आसामी तिज म्हणती मालती
राधामनोहरम् तेलुगु माती
मधुमंजिरी नाम तिचे बंगाली
नाव घेता बघ गंधगुलाली

मधुमालती ही ऋतुराणी
धुंदीमधली ती मधुगाणी
सहज वाढते वेल ही गुणी
मधुमालती ही मधुराणी

दि.२७/९/१९
सायं ६.११ वा.



## (३७)
## सोनचाफा

सोनचाफ्याच्या फुलासारखी
सुखाची मोजकीच फुलं
येऊ देत नशिबी
पण गंध तो अनमोल
कायम राहू देत
सोनक्षणांचा

किती ओढ असते
अशा सुखद क्षणांची
कधी ते मिळतात
कधी अनुभवून
सोनेरी होतं अवघं जगणं

कधी दुरूनच
त्यांच्या सुवासाने
मन तृप्त होऊन जातं
तर कधी
हे क्षण देण्यासाठी
राबणाऱ्याच्या हातातूनच
सोनचाफ्यागत
फुलं होतात जीवनाची

कधी दुसऱ्याची ओंजळ
भरलेली असते अशा
पिवळ्या धमक सुखांनी
अन मनाला भरतं येतं
आपलीच ओंजळ
बहरल्या सारखी

कुठेतरी रानावनात
झाड बहरून येतं
पण सोन्याच्या फुलांना
सुगन्ध अलौकिक येतो

सोनचाफा दरवळतो
तसं आयुष्य दरवळावं
कायम धुंद
पण मंद सुरभीचे
कोश कायम उलगडवत
सोनकळीसारखेच...

दि.१५/९/१९
रात्री १०.४३ वा.



## (३८)
## फुले देखणी ही

गुलाबी छटेची
फुले देखणी ही
मनाला उगाचच
कुणी आठवे की

जडावा जीवाला
असा छंद वेडा
गुलाबी नशेचा
मनी खोल वेढा

कुठे स्पर्श थोडा
गुलाबी फुलांना
कुठे तो खुलावा
हळूच लाजताना

ते दिस होती तेव्हा
गुलाबी शराबी
नजर ती अजुनी
वेड लावी जरासी

कुणी पाकळ्या
ओठी त्या ठेविल्या की
जीवास बेचैनी
सदा अंतरी ती

बहर हा गुलाबी
मदनगोजिरा की
रती सांडते
रंग श्रृंगारगंधी

विसरू कसा तो
तुझा रंग राणी
कवळून घेता
गुलाबी कहाणी

दि.१/९/१९
सकाळी ७.३७



## (३९)
## प्राजक्ताचा सडा

पायी प्राजक्ताचा सडा
कोमल सुखांनी स्पर्शीने
सुख वेचावे वेचावे
हात गंधाळून जाणे

तुझे प्रेम माझ्यासाठी
फूल पारिजातकाचे
लोक तुडवतील गं
मला जपणे जपणे

तू हळुवार कित्ती
भाव तुझे अलगद
मन तुझे कोमलता
लाजशी मी भाळता

एक आशेचा किरण
तुझ्या अळुमाळू फुला
केशराचा रंग त्याचा
वाटे जीवालागी भला

तुझे फुलणे फुलणे
आसमंती सुरभी गं
माझ्या देहाला मनाला
गंध वेडाचे लावणे

तुझे ओघळणे फार
अलवार अलवार
वेणू वाजवीशी नित
अंतर्यामी भुईवर

तुझा गंध बेभानसा
स्वर्गीय सुखकोश
मी कृष्ण सखा तुझा
तूचि रुक्मिणीची आस

दि.१५/९/१९
सकाळी ८.११ वा



## (४०)
## गगनचुंबी बुचाची झाडे

गगनचुंबी बुचाची झाडे
उंच दांडयांची शेलाटी फुले
आभाळी जाऊन पाहती खाली
धरणीला भेटाया उतावळलेली

गंधात विशाल नभसंदेश
धरित्री राणीला सांगण्या हौस
सडे पाडुनी तिला नाहवून
वेळी अवेळी सुरभी पाऊस

पंचपाकळ्या कोरीव फार
परागतंतूही पिवळेशार
पाकळ्या गाली गुलाबी लाली
फिकी पांढुरकी दांडीही खाली

एकसाथ कित्ती उमलून येती
झाडाला गुच्छ ते लगडून जाती
कळ्या दिसती क्षणात फुले
फांदीवर यांचे श्रावणझुले

पडले पडले वेचण्या घाई
पटापट ओंजळीतून बाई
झग्याच्या घोळात दडून बसून
कित्ती मिळाली आनंद होई

भराभर आता विणूया वेण्या
दोऱ्याविनाही गुंफून घेण्या
वेणीत वर फुलांची रांग
दांडयांचे सुंदर कशीदाकाम

बुचाच्या वेण्या वेणीत खोवा
गंध दिसभर असा पसरावा
बालपणीची अल्लड मस्ती
बुचाची फुले होऊन साक्षी

आजही झाड मज आठवे
फुलांच्या गर्दीत मन विसावे
इवल्याशा वेणीत बुचाची वेणी
बालपणीची हुल्लड गाणी

दि.१/१०/१९
सकाळी ६.५० वा.



## (४१)
## हसतेस किती गं गोड

हसतेस किती गं गोड
प्राजक्तसम ते अजोड
लाजतेस प्रिये तू तशीच
नाजूक अन ते स्वर्गीय

तव स्पर्श असे हा सुगंधी
प्राजक्ताची ही धुंदी
मी होतो ना कायमचा
प्रिये, तुझाच जन्मबंदी

शब्द तुझा हळुवार
वाहे माधुर्याची धार
मनच नाही तेव्हा
भाव माझे अजरामर

तू खरेच मम प्राजक्त
मी नाजूकतेचा भक्त
तू जन्मा गंधित करुनी
उरतेस माझीच फक्त

मी कठोर भुंगा तरीही
होतो अलगद हळुवार
ही प्राजक्ताची किमया
मी शिकार वारंवार

तू अशीच प्राजक्तासम
उत्कंठा शिगेला न्यावी
अंजलीत भरता तुजला
कणा कणास भरती यावी

२१/१२,
१३:११



## (४२)
## हक्क कळीचा

हक्क कळीचा फुलण्याचा
दवबिंदूंवर झुलण्याचा
दवास वाटे ते झुलते
हळूच कळीचे... फुल उमलते

आकाशाशी नाते जडते
भुईला फुलाचे स्वप्नची पडते
स्वर्गामधुनी वरुणराज हा
गुंफत जातो माळ अहा...

बिंदू बिंदू चमकत जातो
कामदेव हा दबकत येतो
कळीस तेव्हा उलगडते मग
तारुण्याचे नवखे हे जग

धुंद बिचारी नव्या विचारी
गालामध्ये लाजत जाते
फूल पाकळी रेशीम ल्येते
शेला तलम ओढून घेते

एक अनामिक भुंगा तेंव्हा
गुंजन करतो तिच्या भोवती
दुरूनच ऐशा लाडिकभावें
हृदयभावना त्यात गोवती

दवबिंदूंनी आणले शहारे
रोमांचित तिज करती सारे
क्षणभर नयना मिटून घेता
भुंग्याला ती कोशी पहाते

अशा क्षणाला अबोल तीही
अबोल भुंगा, दिशाही दाही
एक सोहळा सुगंध देतो
धरणीला स्वर्गाशी नेतो

नाजुक ललना कोमल कळी
हसू उमटले गाली खळी
भुंगा नाजूक इतका झाला
फुलून आली कळी पाकळी

२१/१२,
१३:१३



## (४३)
## कमाल निसर्गाची

कमाल निसर्गाची खरी
पदोपदी वाटते
रंग रूप आकाराने
पान फूल जागते

असेच एक पुष्प असे
लालबुंद रंगपाती
पेटत्या अग्निकुंडी
अग्निशिखा धगधगती

पीतवर्ण संगतीला
अग्नी हुबेहूब की
वाऱ्यावरी हलणाऱ्या
शिखांची ही पाकळी

नाम कुणी दिले असे
अग्निशिखा रोपटे
हिरव्या हिरव्या पानातून
शीत अनल गोमटे

श्रावणात यज्ञयाग
मंत्र जागोजागी
अग्निशिखा फुलून येत
स्वीकारी आहुती

निसर्गाने पेटविले
हरित यज्ञकुंड
अग्निशिखा फुले येती
वर्षा होता ती उदंड

दि.२६/८/१९
दुपारी १२.१७ वा.



## (४४)
## हिरव्या पानी बकुळफुलांची

हिरव्या पानी बकुळफुलांची
माळ गोजिरी गुंफियली
गंध फुलांचा सूत्रबद्ध तो
भक्ती सुवासी रेखीयली

मौन सुगंध अबोल गाथा
ईशचरणी ती वाहून घ्यावी
बकुळफुलांची आस ईशाला
त्या हृदयाला भिडवून द्यावी

तुलसीपत्रे नामजपाने
विठ्ठल विठ्ठल गाऊन जाती
कुणी विठ्ठला तुळशीपाने
रचून भक्ती दाऊन जाती

देह विठ्ठल आत्मा विठ्ठल
भक्तिमाऊली अक्षर गिरवीत
पंढरीत त्या साऱ्यामिळुनी
स्वामीत्वाची साक्ष सांगीत

या देहातून तो प्रकटावा
त्रैलोक्याचा स्वामी पटावा
सार्थ होऊ दे जन्म मानवी
देह हरी सारा वाटावा

दि. २२/८/१९
सकाळी १०.५१ वा.



## (४५)
## लुसलुस चिंचेचा चिगोर

लुसलुस चिंचेचा चिगोर
गोळा होती सारी पोरं
चव आंबट कोवळी
बालपणाला मोहोर

झाड पालवी पोपटी
फुलं दिसती गोमटी
रंग दुधाळ, गुलाबी
नक्षी त्यावर केशरी

उड्या मारून मारून
पोरं फाटा वाकविती
नाजूक पालवीला
कवळ्या हातांनी खुडती

चिगोराला चावताना
चिंच चव सान होते
आंबटाच्या नवाळीचे
गावभर नाव जाते

चिगोराला ओंजळीत
भरून आईस देता
वरणात चिगोर शिजूनी
चव अवर्णनीय भाता

कधी चटणी होऊन
पानात ती सजता
चिंचेच्या येण्या आधी
आंबूसपण देता

चिगोर तोडण्याचा
छंद लहानपणीचा
आजही चिंच हाती
अन चिगोर मनीचा

मन चिंच झाड होते
उगा मोहरून जाते
चिगोर आठवांचा
मज बालपण देते
पुन्हा बालपण देते

दि.३०/६/१९
सायं. ६.२७ वा.



## (४६)
## रानजाई रानजाई

रानजाई रानजाई
लखलखत्या चांदण्या
नाजुक गंधतनु
मंद सुवास सांगण्या

पानापानातून शुभ्र
फुले नाजूक डोलती
गुज प्रिय मनातले
दलातून ते बोलती

शेलाटी फूलबांधा
कमनीय की कामिनी
कुसुम कामिनी ते
हृदय संवादिनी

कोणी म्हणते त्या कुंती
दिन का राजा कोणी
कोणी बावरून जाई
वसंत आठवोनी

या फुलाला बहर
बारमाही गंध वाही
प्रीतीचे पत्र जणू
शब्दपुष्प झाडावरी

डवरले झाड झाड
जाई पानापानाआड
काही डोकावून पाही
दिलाच्याही पल्याड

किती नावं एका फुला
मनात घर होई
गंध रानाच्या जाईचा
जाईना कधी बाई

मनात सदा ऱ्हाई
जीवा ओढून तो नेई
कानात रुंजी घाली
गाणं रानातलं गाई

अशी ही रानजाई
कामिनी कुसुमाई
सदा खुलते गंधाने
तिची इवली नवलाई

दि.२६/९/१९
रात्री ११.३० वा.



## (४७)
## दारात चांदण्या गं

दारात चांदण्या गं
लखडल्या वेलीला
फुलण्याची रोज घाई
कोवळ्या त्या कळीला

दार सुगंधले
मन भारावले
परडीत रोज माझ्या
गंध सामावले

देव्हारा दरवळे
रोज त्या सुगंधाने
परिमळ भक्तीचा की
चित्त उमाळून जाणे

सौरभ या फुलांचा
मार्गही थबकतो
थोडा विसावून येथे
गंध भारून चालतो

वाटसरू माझ्या दारी
रेंगाळतात थोडे
दोन फुले तोडतात
नेती संगती गोड कोडे

माझी लेकुरे सख्यांना
दावतात चांदणफुला
तोडण्या बालगोपाल
करती कृष्णलीला

साजन माझा येतो
तिन्ही सांजेला घरात
त्या वेलीसवे मीही
सुगंधाने भरात

जाई जाई अंगणात
साजणी त्या मनात
दारी थांबते सजून
जाईसंगे मी लाजून

तो जाईला पाहतो
मी त्याच्या मोहराला
जाई फुलता परिमळ
आमुच्या संसाराला

ये गं ये गं फुलूनिया
जाई माझ्या तू अंतरी
सुख चांदणं लगडे
अंगणी घरी दारी

दि ४/९/१९
सकाळी ८.४७ वा.



## (४८)
## आम्ही तिघी मैत्रिणी फुलराण्या

आम्ही तिघी मैत्रिणी फुलराण्या
सजून धजून नटनार देखण्या
गुपीत आमचं झाडावर
हिंदोळतोय आम्ही वाऱ्यावर

सोबतीला पाठची भावंडं
झाडाची सानुली पिलवंडं
अजून कोशात, फुलायच्या जोशात
धुंदीत आपुल्या ना होशात

केशरी गुलाबी रंगांची गोजिरी
अंगाची कांती खूप भारी
येरे फुलपाखरा गंध घेण्या खरा
तुझ्या रंगीत साजाला साजिरी

जसा वारा येतो, कानाशी घोंगतो
पाखराची प्रीती, परागी सांगतो
परागाला येतो, आतून शहारा
लाजलंय फूल, उन्हात निहारा

दोन सख्या चिडविती, येणार कोण
गोडुल्या फुलाला पाहणार कोण
एकरंगी एकजीव होणार दोन
दूत मधुकर करतोय गुंजन

आज माझी, वेळ उद्या गं तुमची
सोबत उरात कायमची
पाखरांचा थवा, येतोय म्हणे
शीळ घालतोय, ओठी तुझेच गाणे

नव्याच घरात, कुठल्या गं वनात
पुन्हा नव्यानं रुजायचं
अंकुर घेऊन पावसात जाऊन
पुन्हा नव्यानं भिजायचं

भेट होईल का गं कधीतरी
दूर जाणं लागतंय जिव्हारी
ओळखीची दिशा हुरहूरणारी
येणं होणार का गं सखे माहेरी
येणं होणार का गं सखे माहेरी

दि.५/७/१९
सायं. ६.५५ वा



## (४९)
## लालेलाल चाफेलाल

लालेलाल चाफेलाल
बहरू आला
हिरव्या पानातून लाल लाल
गुच्छ स्वागताला

लाल चुटुक रंगाला
दुधाळ तीठ लावी
रंगसंगती खुशाल
खुलूनिया जावी

मदन गुंगला, असा दंगला
सायाक पंच हरवले
पंच दली लाल पाकळी
शर येथे रमले

चाफेकळीसम पाकळीसम
तन्वी प्रिय बाला
गाली लाली अंगी बहरा
ऋतू हिरवा झाला

मी झाड चाफ्याचेऽऽ
ती बहरफुला
सुवास अंगी
मंद वाहिला

बाळ सानुला, सवे आईला
घेत बोल बोलला
लाल लाल हे फूल
येईना माझ्या हाताला

लाल चाफ्याचा
गुच्छ मिळाला
धावत दावी
सवंगड्याला

यौवनातले क्षण रंगातले
लाल चाफा जपून ठेवी
वय ओसरले ‘जरा’ जराशी
तरी स्मृती सखीस आठवी

भक्त पुजारी निघे मंदिरी
लाल चाफ्याची माळ सुंदरी
भगवंताच्या गळ्यात जाता
पंचप्राणा ये नवविधा उभारी

दि.६/७/१९
सकाळी ९.१३ वा



## (५०)
## चिंब भिजले फूल वेडे

चिंब भिजले फूल वेडे
भूल ऐशी पाडली
थेंब पडता पाकळीवर
किमया कैशी घडली

बरसणाऱ्या सरीत
ओथंबून रंग मिसळले
भावनांच्या हिंदोळ्यावर
थेंब काही थबकले

गुंगलेल्या धुंदलेल्या
पाकळीला ये शहारा
मेघ बरसे तिजला स्पर्शे
आवेगाचा हो निहारा

पाकळीतून साचलेले
पाणी खाली ओसरे पण
पाकळी ना विसरू शकली
बेभान त्याचे आपलेपण

तो शिडावा नित घडावा
पाकळी लाजून चूर
अंग चोरून घेत राही
वेगळा पाऊस पूर

फूल भिजले थोडे थिजले
थंड लेऊन गारवा
क्षण असेही गारठावे
आगळा शिरशीरवा

रंग लाली पावसाला
फूल पाणेरी जरा
मीलनाच्या सोहळ्याला
जायबंदी नजरा

प्रणयबंदी पिंजरा
अजब धुंदी ही जरा
श्वासमोगरी गजरा
थरथरत्या अधरा

पाकळीसम चेहरा
गोरामोरा लाजरा
वसंत येई बहरा
उत्सव हो साजरा

दि.१३/७/१९
रात्री १२.३३ वा



## (५१)
## लिली

लिली लिली लिली
अशी फुलून आली
फुलताच गुपित गोड
कानात बोलली

रंग रंग रंग
सुरेख रंग रंगली
कधी शुभ्र श्वेता तरी
दिसतसे चांगली

लिली लिली लिली
पातीवर नम्र डोलली
लिली अशी कोमलली
तलम वागली

लिली लिली गुलाबी लिली
लाली गाली शोभली
मंद वारा स्पर्श शरीरा
होतसे मृदु गुदगुली

लिली लिली नटली सजली
रूपाने चमकली
प्रेम वारा सांगताच
गाली खळी उमटली

नेईन तुला उडवूनि
त्याने गझल गायिली
स्वीकाराचे स्वप्न फुलले
लिली खुदकन हसली

अंजलीतुनी लिली
मार्ग एक चालली
गंध मंद देत आसमंती मावली
लिली भावली, लिली भावली

प्रेम शब्द धार अमृताची
लिली नाहली
हळवी लिली बावरली
प्रियतमाचरणी वाहिली

दि.१३/७/१९
दु.३:०५ वा



## (५२)
## जगात ऐशी किती फुले

दखल ना घेती कुणी जयांची
जगात ऐशी किती फुले
रानोमाळी फुलून डुलती
कुणी तयांचे कौतुक केले?

लोकांच्या नगरीत वाढला
वृक्ष बदाम असे विशाल
फुले कोवळी सान कुडी
पंचतारींीकित खुशाल

वरंगा भुलत्या संसारी
नजरेत तरी का भरतील सारी
मायबापाहून दूर जाणारी
बदामफुले ही अशी पोरकी

कधी कुणाला दिसतील ती
करंडीत मग बसतील ती
बाहेर आल्या लांब तुऱ्यांनी
कथा आपुली सांगतील ती

काही फुले झाडावर बसली
माय फांदीला घट्ट बिलगली
ती फळली अन बदाम झाली
काही फुले मग उगाच हसली

हलके नाजूक फूल जाऊनी
जड फळाला तुम्ही धरले
दगड धोंडे खाऊन शेवटी
फोडून तोडून हालंच झाले

बदाम म्हणती वेडे तुम्ही
उपयोगाला आलो आम्ही
फूल चांदणी लेऊन आले
तरी पायदळ कुणी तुडविले

फूल बदामी रुसले मग
स्वतः स्वतःवर हसले मग
येईल कोठून तरी रसिकवर
उचलून घेण्या डोक्यावर

दि.७/७/१९
दुपारी १२.४० वा



## (५३)
## ही फुले की पाने सुंदर

ही फुले की पाने सुंदर
रंग तयांचे मोहक छान
किती नक्षीचे काम करुनी
सृष्टी देते सुरेख दान

या पानांनी रंग गुलाबी
गडद नेसला पानोपानी
रीत काढली मोडीत बघ ना
हरित रंग सोडून तयांनी

जशी सुंदरी वसन भरजरी
शालू अथवा नेसे पैठणी
त्या पानांनी काठावरती
श्वेत किनार ही घेत कोरूनी

चंदेरी ती नाऽऽगमोडी
रजत फुलांची लेस जोडली
चमकून उठला रंग गुलाबी
गुलाबी ऐशी जादू घडली

उगा वाटते कुणीतरी हे
दवबिंदू मग काठी ओवले
रांगेमध्ये बसून ते तर
पानाच्या रुपास भाळले

किमया ऐशी घडे सारखी
निसर्ग वेडा कारागीर
रसिक थबकतो ना नवलाई
थांबून थोडा पाहे फकीर

दि.१६/१०/१९
सकाळी११.४७ वा.



## (५४)
## ही बुचाची फुले उमलली

ही बुचाची फुले उमलली
की रानाची दिवाळी
शुभ्र तेजोमय पुष्पदीप
वनराईस देती झळाळी

हिरव्या पानांमध्ये पहुडली
बाळकळ्यांची दाटी
झाड झुलविते झोका त्यांना
वारा येऊन पाठी

कधी वाटते आकाशाने
रंग जरा बदलला
निळीनिळाई सोडून त्याला
हिरवा नादची जडला

उंच उंच थांबून लटकून ते
थोडे थकून गेले
धरणीच्या कुशीमधे येऊनि
पान पान हे झाले

पाठोपाठ आकाशाच्या त्या
चांदण्या साऱ्या आल्या
गंधाळून किती धुंदीमध्ये
फुले नव्याने झाल्या

रूप देखणे चमचम होते
केवळ प्रकाश थोडा
फूल झाले अन तेजासोबत
परिमळ तनी सांडला

दूरदूरच्या अशा चांदण्या
कधी ना हाती आल्या
फुले जाहल्या झाडावरूनी
सडा टाकुनी गेल्या

अलगद त्यांना वेचीत असता
सुरभित अंजली माझी
अशा चांदण्या घेऊन हाती
आकाशाशी नाती

ही बुचांची फुले आज की
आनंदाने न्हाली
झाडावरती खुलून बिचारी
मनात उजळून गेली

अशी फुलांची फूलदिवाळी
रोज वनी घडते
सुगंध पसरीत अंधारातून
तेजप्रभा सांडते

दि. १७/१०/१९
सकाळी ७.४१ वा.



## (५५)
## आजी म्हणायची, गोकर्णाची

आजी म्हणायची, गोकर्णाची
फुलं आण गं बाळे गुणाची
शिवशंकरा प्रिय ही आहेत
आणिक सोबती ती बिल्वदळे

दोन रंगात फूल उमले
पूर्ण शुभ्र तर कृष्णतनु निळे
दुधाळ झाकी आत निळ्याच्या
रंगांची छटा खोल मनाच्या

वेल नाजूक, फूल कोवळे
अलगद हाताने खुड गं बाळे
गोमाता पवित्र, पावन गोमूत्र
तिच्या कानाचा आकार सत्त्व

कर्ण पटलासम ऐकावे सारे
पंचप्राण गोळा कानात व्हारे
ऐक गुरूंचे, मातापित्यांचे
वडीलधाऱ्या साऱ्या जनांचे

गोकर्ण ऐकून घेतो की सारे
शंकर भक्तीचे वाहती वारे
गूज मनीचे शिवाच्या पायी
फूल गोकर्ण ठेवते बाई

सत्त्व भावाची उधळण करते
गोकर्णाची वेल फुलात बोलते
भक्ती असावी विस्तीर्ण पात्र
अंतरंगात सूक्ष्म ते गात्र

आत्मा नाम असे अंतरंगाचे
आत्माराम सुंदर सत्य शिवाचे
गोकर्णासम जीवास करी
शिवाची भेट होय अंतरी

वाहा तू जीवाचे गोकर्ण फूल
शिवपिंडीवर नम्र वाकून
बाह्य ध्वनी नको ऐकूस आता
नम: शिवाय होऊ दे गाथा
नम: शिवाय होऊ दे गाथा

दि. ४/१०/१९
सकाळी ६.२३ वा.



## (५६)
## रे जास्वंदा

रे जास्वंदा, रे जास्वंदा
तू फूल भाग्यवंत
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

तू हरिवल्लभ, रुद्ररक्तजयपुष्पी
जवाकुसुमही जपाकुसुमही
अन फुल तांबडे अरुणी
श्वेतरक्त वर्णात नाहते
पीत गुलाबी नारंगीही
रंग तुझे बघुनिया
मिळतसे या नयनानंद
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

बारमासी तू फुलून येशी
आकर्षक तव रूप मोहिशी
पक्षी, पाखरं, फुलपाखरं
मधमाश्यांना अप्रूप
टवटवीत ताजे तवाणे
दिसभर सौंदर्याचे गाणे
सायंकाळी मलूल होऊन
तेज तुझे हे मंद
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

पाच पाकळ्या पंचप्राण की
डुलतील फुलतील ते
जीवन जणू की दिवस एक हा
आनंदाने खुलेल
ताजे जीवन चरणी वाहू
ईश गळ्यातून सजून जाऊ
सुकेल तेव्हा कसा दरवळे
कोणताही हा गंध
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

गजाननाशी नाते तुझिये
कसे अलौकिक असे वेगळे
त्याला तू तर अधिकतम प्रिय
फूल वाहू की आगळे
देवाशी साक्षात प्रियता
भाग्य तुझे अनमोल
काय पुण्य हे केले की तू
गणेशाशी अनुबंध
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

हृदयातले नकोसे द्रव्य
न्यून करूनी बघ दे आरोग्य
केसांसाठी तू वरदान
रेचक म्हणुनी तुझा सन्मान
मूत्र साफ होते की क्षणात
रक्तदाबही नियंत्रणात
जीवन सत्त्वे देशी इतुके
औषधी गुणधर्माचा कंद
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

कुठे जगातून शुष्क फुलांची
चविष्ट शाका बनविती
कुठे पदार्थ रोचक करिती
फुला तुझ्या पचविती
पानाफुलांचा अर्क सांगतो
आरोग्याचा मंत्र
आरोग्याचे शास्त्र तुझ्या रे
गुणधर्माने धुंद
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

नसे तुला बघ गंध कोणता
मंद गंधाचा प्रकार तुझा
झाडावरती हलवीत फुल
वारा पाडे मनास भूल
हारामध्ये सजुनी रुळशी
विनायकाच्या वक्षी
वाचून तेव्हा अलगद घ्यावे
त्या हृदयाचे स्पंद
आदिदेव श्री गणरायाला
तुझा एक छंद

दि. १७/१०/१९
वेळ - ६:३५.



## (५७)
## कर्दळ वाढे

कर्दळ वाढे, वाढे दाराशी
परसदारी वा अंगणी उभीशी
थोडी लाजिरी, थोडी बावरी
पानांच्या घोळक्यात कोंब साजिरी

कळ्या कळ्या, गोऱ्या उंचपुऱ्या
उमलू पाहती भराभरा
फुलांचे सोहळे किती टिपावे
कर्दळीत चित्र असे दिसावे

रंग आगळे, रंग वेगळे
पानात तिच्या नैवेद्य साजे
कर्दळ वेडी मान ना पान
बनून राहते बिचारी सान

तिच्याने वाढे किती हिरवाई
डोळ्यास दिलासा ताजी नवलाई
फुलांना गंध नाहीच तिच्या
रंग आकारे लोभस भाषा

गावाच्या घरी, कर्दळ दारी
हाताशी तिची पाने सहजी
सोबत तिची सखीसारखी
गरज दिसता धावत राही

वेळ न दिला, पाणी न दिले
तरी वाढते प्रेमभराने
ताजी पोपटी हिरवी पाने
फुलांची टोकाला बांधून तोरणे

सोशिक कर्दळ, स्मृतींची वर्दळ
कर्दळीवनात स्वामींचा दरवळ
तिथेच तिच्याऽऽऽ राहिले वनी
आत्मी तिच्या सामावले हो स्वामी

योग्याचा रंग संन्यस्त फुले
लाल केशरी मस्तकी टिळे
स्वामी स्वामी बोले मनी कर्दळी
रोजची ती आज भासे वेगळी

दि. ४/१०/१९
रात्री ११.२१ वा.



## (५८)
## फुलांचे संमेलन

फुलांचे भरले संमेलन
एका झाडावर कोमलपण
सौंदर्याचा महापूऽऽऽर
प्रियजन माझे अतिदूऽऽऽर

आठवावे तिचे ते गाल
लज्जेने गुलाबी लाल
फुलासम नाजूक स्पर्श तिचा
मी होतो क्षणात बेहाल

डोळ्यात लाऽऽज दाटे
आज ती वेगळीच भेटे
गुलाबी गुलाब अत्तर
फेकते कटाक्ष सत्तर

कपोली घर्मबिंदू जमती
दवाचे थेंब पाकळीवरती
पुसाया थोडा नजीक जाता
बिंदुही थरथरून उठती

अधर की सडे अमृताचे
भरले तिथं घडे मधुरतेचे
टिपून घेताना स्मितहास्या
बरसणे मृदुकोमलतेचे

चेहरा तिचा की फुललेला
गुलाबी गुलाब रुळलेला
कधी ना सुकतो तो तवाना
जगण्यास गंध आऽऽला

स्पर्श ते तिचे मुलायम की
फुलांचे शरीरी गुंफण
तिच्या प्रेमात ते बेधुंद
फुलांचे तनी परिमळ मंद

आठवांनी मी कासावीस
जड जड सरती ना हे दिस
ती नाजूक शिकारी होऊन
सावज करते मज काळीज

फुलांनो, गुलाबी होताना
तुम्हीही तिलाच पाहता ना
मधाचे सुगंध भरताना
तुम्हीही तिलाच स्मरता ना

शिका त्या साऱ्या अदा तुम्ही
माझ्या प्रियतमेच्या की
लाडकी तुमची ती होईल
तलम मऊ जगणे जी शिकवील

दि. ०७/११/१९
सकाळी ७.५४ वा.



## (५९)
## शेवंती गं शेवंती

शेवंती गं शेवंती, गोडगोजिरी शेवंती
तू फुलांची राणी होशी, असशी मधुवंती
सहाही ऋतूत बहरा येशी
भुरळ मनाला तूऽऽऽच पाडिशी

पाकळ्या किती कोणी मोजील्या
गंध विणल्या वेण्या घातल्या
तव वेण्यांची हौस साऱ्यांना
देवीला तशी महिलागणा

श्वेत मोतीया पीत रंगांची
हसतेस मधुर तू मुक्त ढंगाची
सजावट तुझी मनोरम किती
मनास मोहे तुझी श्रीमंती

तुझे हसणे, तुझे दिसणे
तुझे पाहणे, प्रियेची स्मृती
अलगद हाती येशी लाजशी
तिच्यासवे तूही टवटवीशी

मंदिरी तुझे देवाच्या गळा
हार रुळती त्या भक्तीच्या वेळा
प्रसन्न लहर ही आत्मसागरी
जीवशेवंती हरिचरणाशी

शोभा वाढते राऊळी किती
नक्षी शोभते ताजी शेवंती
टिकते कैक दिवस ती तर
न सुकणारे फुल हे लवकर

शुभप्रसंगी विवाहवेदी
शेवंती तिथे पोचते आधी
भक्ती उसळे शृंगार शोभे
प्रियेच्या केशकलापी साजे

फुलमाळ्याचे घर चालवीशी
गरीब तुझ्याने नाही उपाशी
बाजार रस्ती कडेस कोणी
उघडे विवस्त्र मूल झोपवुनी

वेण्या भराभर गुंफून तुझिया
विक्री करूनी चूल फुंकण्या
घास तयांच्या पोटी तुझ्याने
तुला बघुनि हे सोपे जगणे

जय विजय साजरे सारे
गळ्यात माळा कौतुक तुरे
नवरानवरी आणि पुढारी
सणोत्सवही होती साजरे

देव जरी मज विचारी कधी
जन्म कोणता हवा सांगशी
शेवंती होईन राऊळी जाईन
सखीच्या वेणीत प्रेमाने राहीन

आनंद देईन मुखश्रीवरी
हर्षोल्लासाच्या लाटा सागरी
गरीब पोटाची खळगी भरीन
जगणे मरणे सार्थक करीन
मी शेवंती होईन, मी शेवंती होईन

दि.०६/१०/१९
दुपारी २.३० वा.



## (६०)
## गवतफुलांशी बोलून आले

गवतफुलांशी बोलून आले
काल तिन्ही सांजेला
डोलून, डवरून सांगून गेले
गुज मनीचे मजला

रोज सकाळी उन्हात भिजूनी
शक्ती नवी घेता
दिसभर चैतन्याशी आम्ही
सदोदित खेळता

कधी ही आमुची रानफुले
तर कधी तुरे उगवती
उन्हं, सरी पावसाळी आणिक
शिरशिरी थंडी घेती

दिसभर सूर्य जसाही फिरतो
त्या उन्हासवे उजळतो
वाऱ्यासंगे डोलून डोलून
रानाशी बोलतो

कधी उन्हाशी लपाछपी
तर कधी वाऱ्याशी गप्पा
कधी देतो मग इवल्या फुलाला
हळूवारसा धप्पा

असे कितीसे वेगवेगळे
खेळ आम्ही मांडतो
ना रुसतो ना फुगतो
आम्ही नाही कधी भांडतो

गवतपाती ही आमुची आई
'खाऊ' आम्हाला देते
तिच्या अंगावर हुंदडतो,
ती मस्ती साहून घेते

सायंकाळी तिच्या कुशीतच
अलगद पहुडताना
स्वप्नातही ती थोपटते
गीत अंगाई गातांना

आम्हीही जगतो क्षणाक्षणाला
चिंता उद्याची नाही
जगणे दुसरे काहीच नसते
क्षणास फुलवत जाई

गवतफुलांचे गूज जाणुनी
मीही नव्याने शिकले
चिंता काळज्या सोडून देऊन
गवतफुलांचे ऐकले

आता मी सारे ऋतू पाहते
सेवा मज करताना
सृष्टी सारी सुखसोहळे
माझ्याचसाठी भरताना

दिलखुलास माझे हसणे, बसणे
आणिक जगणे आता
मी हलके हलके गवतफुलासम
होऊन जगणे आता

दि. २४/११/१९
सकाळी ०८.११ वा.



## (६१)
## ही नाजूकता अशी दिसावी

ही नाजूकता अशी दिसावी
फुला पाकळीतून उमटावी
तलम पारदर्शी इतुकी की
थेट मनाला भिडून जावी

मन हलके हलके हे भावुक
दुजा मनाशी होत एकरूप
चेतन कोणी असो अचेतन
क्षणात होऊन जाईल समरूप

नाजूकता इतकी ते घेईल
कुठेतरी जरी दु:ख कुढेल
या हृदयातून ऐक हुंदके
स्वत: ते बघ इतके रडेल

कधी कुणी असता समाधानी
ढेकर देईल मन अभिमानी
आनंदाने उठती फवारे
तुषार इकडे, शीतल वारे

कुणी न सांगता कळेल सारे
व्यथा असो वा मोद भरारे
जगणे परके नसेल तेव्हा
एकदिलाचे अनुभव व्हा रे

ही नाजूकता पाषाणाच्या
छाताडावर नाचनाचूनी
पाझर फोडेल, तो वितळेल
द्रवुनी तयाचे मन विरघळेल

असुर भावना जाय लयाला
सुरवर माणूस इथेच होईल
हृदयपाकळी कोमल कळी
पृथ्वीवरती स्वर्ग उभारेल

दि.२६/११/१९
सकाळी ६.०३ वा.



## (६२)
## **खळखळून हसताच कळीचे**

खळखळून हसताच कळीचे
फूल एवढे सुंदर झाले
एक अनोख्या रंगांचे ते
झाडावरती झुंबर झाले

तिथे पेटले दिवे उजेडी
वाऱ्यावरती झुलती वेडी
अशी लावण्ये बहरा येऊन
मनास लावीत जातील गोडी

झुंबर हे की अतिशय नाजूक
स्पर्श कोवळे सुगंध साजुक
परमेशाची कलाकुसर ती
उद्यानातून जाऊ मोजुक

जो जो जवळी जातो आपण
खुलून येतील चैतन्याने
क्षणात आपण फुलून येता
खुदकन हसतील मोदभराने

आकाशाची घेत प्रेरणा
लटकून झुंबरे दिनकर निशिकर
हिरवी फुलझाडेही प्रेरित
लटकून फांदीवर कुसुमाकर

किती उत्सवांना ही सृष्टी
रोज मनवते रंगारंग
दृष्टी उघडून खुले करावे
दडून बसले अंत:करण

दि. १३/१२/१९
सकाळी ६.३४ वा.



## (६३)
## बकुळी बापुडी

जगावेगळ्या कळ्या तिच्या
अन् फुलून येते ती उपडी
कधी न काही कुरकूर करते
गरीब बिचारी बकुळी बापुडी

तिच्या पालथ्या फुलण्यामध्ये
जगण्याचे हे तत्त्वचि दडले
कुणी करू दे किती दुर्लक्षित
पाठ त्याकडे करूनी फुलले

रंगसावळ्या परी त्या गोजिऱ्या
पुष्प वेगळ्या बकुळफुला
हळूहळू, ना दंगा करता
उमलत नेशी मूक कळ्या

त्या अबोल तेव्हा, अबोल राहून
जन्मभरीचा सुगंध भरतील
झाडाखाली बसता थोडे
जन्मालाही परिमळ देतील

उत्तम कर्म सुगंध देईल
असता नसता जगतामधुन
हळूच येथून जातानाही
हार बकुळीचा घ्यावा घालून

नाजूक हाराचे ना ओझे
तीही बिचारी सांगत जाईल
जगणे सुंदर करूया मग हे
मौन सुखाने वरचढ होईल

कशास बोला शब्द कुणाला
अर्थाचे जन मालक होतील
जो न बोलला तोही घेतील
शब्दांना ते अनर्था नेतील

म्हणुनी बकुळीसम फुलणे हे
जरा वेगळे शब्दावाचून
हाती कोणी घेईल जेव्हा
तरीही घ्याना मौना वाचून

दि. २०/१२/१९
सकाळी ७.५४ वा.



## (६४)
## फूल वेगळे इथे जन्मते

अशी कशी ही किमया घडते
जगावेगळी निळाई चढते
तुझ्याच पायी येण्यासाठी
फूल वेगळे इथे जन्मते

क्वचित देखले फूलताटवे
रंग विराळे असे निराळे
कधी वाटते खरे नं हे
निळे कुंचले रोमही निळे

झाडालाही पडले कोडे
अवचित ऐसे कैसे घडले
लाल, गुलाबी, पिवळे, केशरी
सोडून रंगा निळाई पांघरे

उद्यानातून फिरता फिरता
हात तुझा हळुवार फिरला
तव स्पर्शाची ताकद देवा
नीलरंग बघ तुझा घेतला

असे वेगळे फूल उमलले
वाऱ्यानेही संगी नेले
फूल अनवट डुले निराळे
श्रीरंगाने आपुले केले

दि. १८/७/१९
सकाळी ७.४७ वा.



## (६५)
## कमलदले

कमलदलांनी असे ठरवले
बंद कोशी ना राहणे चांगले
झोकून देऊ, मोकळे हसू
आणि कळीचे कमळ उमलले

निराश होती कळी अनेकदा
मी चिखलातून का उगवावे
अंगाला मज चिक चिक घाण
मी अशातच का जगावे

जन्मा कोठे यावे आपण
हाती नसते ते कोणाच्या
कसे जगावे हाती आपुल्या
कामी यावे जगताच्या

विचार कळीने केला पक्का
दला दलाला आतून धक्का
झटका सारे मळभ विसरारे
हसून कळीचे फूल व्हा रे

पाण्यामधले पानगालिचे
रेशीम हिरव्या मखमालीचे
चिखल तळाशी पायदळीशी
रंग अनोखे कमळकळीचे

असता अनुकूल स्थिती ही सारी
नवल काय ते घेता भरारी
प्रतिकूलतेमधून हसरे
उमलून येईल फूल करारी

ज्याला येते करता मात
लक्ष्मी देते त्याला हात
हाती न नुसते घेऊन बसते
आसन होते कमळ सुखात

कधी कुण्या रमणीची लोचने
कमलदलासम रेखीव लंब
सतेज पाणीदार डोळ्यातून
प्रीतीचे उमटे प्रतिबिंब

नानारंगी कमलप्रकार
विभिन्नतेचे ते आकार
सूर्यविकासी, चंद्रविकासी
कमलांनी नटले कासार

श्रीविष्णूच्या नाभीमधून
मूलस्थान तू ब्रह्मा होऊन
जगताचे उत्पत्तीकारण
त्याचेही तू हो उद्धरण

कमलाकराच्या हाती शोभतो
कमळफुला तू दिव्य भासतो
काय हवे तुज सांग अजून
कुठे जन्मला उत्कर्ष कुठून

तुझे हास्य विष्णूच्या गाली
स्वयं लक्ष्मी उभी राहिली
आता उदास ना होणे तुजला
देवांची स्वीकृती ही आली

दि.१५/७/१९
रात्री ९.२७ वा.



## (६६)
## फुलं भरल्या करंड्या

फुलं भरल्या करंड्या, सजल्या दारी
लेवून गंधाची अत्तरे
दरवळ जाता चोहीकडे, मी लपवू कसे
जर गंधच देतो उत्तरे

घरात ठरला शुभ सोहळा
लगबग झाली सगळीकडे
करंडीत आनंदही भरला
हसून फुलांनी फेर ही धरला

नवरीसाठी गजरे झाले
चेहरे सगळे हसरे झाले
सुवासिनीही धावत आल्या
वरमाला वधूमाला सजल्या

मंगलाष्टके मंत्रोच्चार
विवाहविधीचे सोपस्कार
मनात फुलता गजरा आता
नको अन्य काही उपचार

देवधर्म पूजा संस्कार
देव गळ्यातील मोगरहार
मृदु फुलांचा साज शृंगार
गंधमोगरी धूपाचार

आज दिवस संपेल असा
नवजीवन आशा ही निशा
मंचक सारा मोगरामय
ती माझी नि मीही तिचा

संसाराची बहरेल वेल
मनात बंदी मोगरवेळ
गंध तिचा की, गंध फुलांचा
सारा माझा अंतरखेळ

भरभरून मी जगता क्षण
गंधित वेळा गंधित मन
एक मोगरा किती सांगतो
वेचून घेतो मी पटकन

एक कुपी हृदयात माझ्या
अंतरी बसली, गंध मोगरा
निवांत बसता दरवळ देते
पट दाखवते सगळा सगळा

दि. १८/०७/१९
दु. ०१:३०



## (६७)
## माझ्या अंगणी तारका

माझ्या अंगणी तारका
मोगऱ्याच्या ह्या चांदण्या
हिरव्या हिरव्या पानातून
लुकलूक गंधगोण्या

त्यांचं आभाळ धिटाचं
पाणी नसता पुरेसं
पोसतंय न सुकता
ताटव्यांच्या ह्या थाटात

चांदण्या मोगऱ्याच्या
कळीदार शुभ्र होती
आणि अंगणाला माझ्या
चांदणवेळा देती

नाही कसलीच आस
मोगरीला पाहताच
सुरभीचे घडे टंच
मनवेली नाहतात

मोगरीचा सडा नाही
अलवार तो पडत
हातांनी त्या चांदण्यांना
खुडण्याची की गंमत

अंगणाचा हा सुवास
दरवळे कोस कोस
शरदाच्या चांदण्याचा
परिमळ भरघोस

जरा बसता शेजारी
ऐकू मोगरीची गाणी
पाकळीचे सूर होती
गंध आरोही कहाणी

जरा बसता शेजारी
कानी मोगरीची गाणी
मला डोहाळे फुलाचे
बीजफळ गंधवोनी

दि. १९/७/१९
सकाळी ७.२१ वा.



## (६८)
## हिरवा चाफा

हिरवा चाफा, हरी चंपा
मदनमस्त, मनोरंगिनी
नानाविध नावांनी हे
फूल मंद सुरभिनी

मधुरमय सुवास थोडा याचा
हिरव्या पाकळ्या जाडसर ढाचा
फूल पाहते धरणीला
पिकता फुलाचा रंग पिवळा

फुलता हिरवा चाफा येतो
गंध हुंगण्या थवा पाखरी
जाण न सगळ्या खगराजांना
अशी फुलाची जात ही न्यारी

मधमाशांचा पडतो गराडा
खालून फुलात प्रवेश न साधा
सुमनघरात जाऊन मग त्या
निवांत प्राशन करती मधाला

फूल जरासे असे वेगळे
सर्वांना सहजी ना दिसते
मोह पाडतो हिरवा चाफा
शोध घेऊनी गंधा चाखा

नासिकेतुनी जातो परिमळ
घशात वाटे हा मधुर गुळ
हरीला प्रिय असणाऱ्या चाफ्या
भेटून घ्यावे इच्छा प्रबळ

दि. २०/७/१९
सकाळी ९.२७ वा.



## (६९)
## पानोपानी रंग हिरवा

पानोपानी रंग हिरवा
प्रसन्न करती छटाही सर्वा
सृष्टीराणीचा शालू बरवा
नेसून आल्या फुलास मिरवा

पर्णमाऊली, कळी ही कन्या
हट्ट करीतसे आईस आपुल्या
नेसून बघू दे हिरवा शालू
दोघी सारख्या कशा गं दिसू

रंग तुझे गं विविध किती
हिरवे सोडून आकर्षती
कशास हवा तुज रंग हरित
रंगवेडी फुलपाखरं समित

तू माझ्या रंगात रंगशील
वेगळी कळी मग ना कळशील
बघ गं फुलराणी तू असा
हट्ट व्यर्थचा सोडून जरा

नाही नाही आज मला
बघायचेच की सृष्टीला
अंगावर ऋतू हिरवा पांघरून
सगळे मज पाहतील गांगरून

हात कुणी लावील पुन्हा
खरे फूल की हा चकवा
मी लपल्यागत होईल पानी
पाहील गंमत तुझ्या आडोनी

असले फूल हवे गं मजला
कधी न पाहिले रंग चांगला
घे ना आई रोप असे
हिरव्या फुलांचे रूप कसे

सांगीन जाऊन सगळ्यांना
कळी अजब अन फूल बघा
तिचा तो लाडिक हट्ट पाहुनी
मीही सजले सोबती जाण्या

आई, रंग तुझा मी लेऊन झाले
तुझ्यासारखी समजुतदार
कधी वेगळा विचार घ्यावा
मनास करीत हिरवेगार

दि. २०/७/१९
पहाटे ५.३० वा.



## (७०)
**ब्रह्मकमळ**

ब्रह्मकमळ फुलते
भाग्य ज्याचे ये फळाला
याचा नियम वेगळा
अर्ध्या रात्री उमलण्या

पूर्ण रजत वर्णाचे
शुभ्र दळी मोठेपण
परागांची शेज होते
विष्णू देवा झोपण्यास

नारायण नाभीतून
येई कमळ आकारा
ब्रह्मदेवाची उत्पत्ती
सृष्टीकर्ता साकारला

ब्रह्मा विराजित तेथे
विष्णू उत्पत्तीचे मूळ
ब्रह्मकमळ फुलता
दु:ख दूर गे समूळ

वर्षानुवर्षे याच्या
उमलण्याची प्रतीक्षा
उमलता घाई होते
पूजण्याची त्या विवक्षा

फूल उमलून येता
लगबग घरीदारी
पूजन त्याचे करू
वाहू शिव पायावरी

ब्रह्मा विष्णू शिवाच्या
गुंतलेल्या नात्यासाठी
फूल कमळाचे होत
रात्री फुले जगजेठी

दि. २०/७/१९
सायं. ७.१९ वा.



## (७१)
## गोड गोजिरे

गोड गोजिरे फूल साजिरे
पाकळी पाकळी कमानदार
केसर रंगी बुडून आले
कवळे कोमल अंग तरार

उमलताच ते खुदकन हसले
सोनेरी क्षण सोबती
फूल फुलाला चिकटून बसले
मस्त चालल्या गुजगोष्टी

विश्व आपुले असे वेगळे
फुलणे सुकणे चालायचेच
जीवन जितके मिळे आम्हाला
जगणे भरभरून खुलायचे

गालाला बघ गाल लागता
सखे तुझा गं कोमल स्पर्श
जितकी मैत्री असेल आपुली
भरूनी टाकू मोद न हर्ष

अलगद, हळुवार कोमल भाव
मृदू, हळवे अन अति अलवार
रंग केसरी सोनपाकळी
कळीही फुलण्या बघ तैयार

रूप देखणे गोजिरवाणे
बाळ सानुले स्पर्श कोवळे
देठावरती वाऱ्यासंगे
भुलून डुलणे असे सोहळे

वारा आपुला दोस्त चांगला
परिमळ नेतो देश विदेशा
फूलपाखरे येती भेटण्या
परागकणांना वाहून नेण्या

जेथे जाऊ तेथे उगवू
कशीही असू दे वसुंधरा
प्रकाश पाणी माती वारा
कोंब उगवण्या प्रयत्न सारा

पुन्हा पुन्हा बघ उगवत राहू
कूस मातेची उजवत राहू
पुन्हा नव्याने जन्मा येऊन
हसत, फुलत, डुलत राहू

दि. २०/७/१९
दुपारी १२.३७ वा.



## (७२)
## पिवळा गुलाब

पिवळा गुलाब एकदा रुसून
फुलून गाल बसला फुगवून
कोणी बरं प्रेमाचा रंग
लाल असं टाकलं ठरवून

मलाही यायचंय तिच्याकडे
त्याच्या भावनांचे साकडे
हाती मी अन सांगेल तो
किती जीव गं ओवाळतो

हळूच हात थरथरता
स्पंदित होईल मम कलिका
रंग कोवळ्या सूर्याचा
प्रकाश लख्ख तेजाचा

शांत दिलासी पीतवर्ण
ऐकून घेण्या उत्कट कर्ण
मैत्री मधुनी प्रेम जुळते
प्रिये हे नाते अतूट ठरते

दोन जीवांच्या मैत्री भावना
प्रेमातही असतील जाग्या ना
प्रवास सुखकर होतो गं
अधिकार प्रेमाचा असतो गं

लाल गुलाब एकवेळ जाईल
तिच्याकडून अव्हेरला
किती धिटाई म्हणून त्याची
प्रस्ताव जाईल नाकारला

मैत्रीमधुनी शुद्ध प्रेमाची
प्रांजळ कबुली देताना
पिवळ्या गुलाबा सखी पाहते
हळूच लालसर होताना

शांतपणे ती विचार करूनी
प्रस्तावाला स्वीकारेल
लाल गुलाब, जे करू न शकला
पिवळा सखीहृदयी उतरेल

दि. २२/७/१९
सायं. ७.०३ वा.



## (७३)
## गर्द निळ्या जांभळ्या फुलांची

गर्द निळ्या जांभळ्या फुलांची
रंगीत दुलई पांघरावी
वर्णहीन डोंगरानं देखील
हिरवी चटई अंथरावी

निळी जांभळी फुले केवढी
उत्सुक दिसती डुलण्याला
रानफुलांचा वर्णोत्सव हा
जरूर या हो पाहण्याला

आपुल्याच नादात फुले ही
नंदकुमारा आळवती
राधेच्या गालाची निळाई
अंगाला माखून घेती

घरादाराशी उमलणारी
गोकर्णाची फुले जांभळी
गोपालाच्या आठवणीत
तीही दाटसर घेती निळाई

गाईच्या कानाचा घेऊन
हुबेहूब शरीरा आकार
शिवशंभुला प्रिय होऊनी
गोकर्ण मानते जणू आभार

निसर्गास ना कधी वावडे
कोणत्याही त्या रंगाचे
फुलास तर फुलणेच आवडे
रंग ल्येत श्रीरंगाचे

हिरव्या पानांवरती दिसती
निळी जांभळी फुले डोलती
रंगांचा कुंचला हरीचा
फिरता रंगही बोलू लागती

दि. २२/७/१९
सायं. ६.४६ वा.



## (७४)
## फूल फुललंय दारी

फूल फुललंय दारी
गर्भार पाय भारी
त्याच्या उदरात आहे
कळी उमलू पाहणारी

आज फुल ते जरासं
मला वेगळं वाटलं
आई दिसली त्याच्यात
कोंबा कुशीत घेतलं

लाल गुलाब पाहता
शृंगाराची भाषा होतो
आज मातृत्व लेऊन
मायेला तो पांघरतो

काही चकीतचकिते
जीवनात घडतात
सृष्टी तशीच आगळी
कधी नियमा मोडीत

फूल फुलताच बघा
आज आई की हो झाले
त्याचे पुरवा पुरवा
गंधभरीत डोहाळे

आई नाजूक सुमन
अशीच असते ना
तिच्या पोटातली कळी
फुलण्याचं सांगते ना

कुणा कळतंच नाही
कळीचं, आईचं हृदय
पोटातच खुडताना
दोघी रडती धाय धाय

खुलू द्यावं फुलू द्यावं
तिला हसून जगू द्यावं
उद्या तिच्याही गर्भात
फूल भविष्याचं पहावं

दि. २१/७/१९
रात्री ९.४७ वा.



## (७५)
## फिक्या रंगांची शोभा

फिक्या रंगांची शोभा निराळी
आकाशी नभ उतरून खाली
फुलाफुलांवर पसरून जाता
धरागगन घे नवी उमाळी

सोनपिवळे सोनेरी
सूर्यबिंब हो फूल पाकळी
सुवर्णकांती फुलराण्यांनी
साडी नेसली लिंबू पिवळी

मधे मधे ती शुभ्र पांढरी
फुले चमकती नभी चांदणी
साऱ्या रंगांमधून श्वेता
पांढुरके कोरून गोंदणी

फिकी जांभळी रंग नवाळी
आपुला तोरा गात वेगळी
तुऱ्यातुऱ्यातून डोलत राहते
नाजूक रंगांची रंगाळी

रंग केशरी ताजातवाना
आळवत राही गायनताना
फूलपाखरे येती मिचकवत
गोल गोल डोळे, पंखतराणा

फिके गुलाबी फूल ताटवे
गालावरती कुणी सांडले
अधरावरती रंग पसरूनी
लज्जेची पाकळी वाटते

मऊ मखमाली रंग पोपटी
पानापानामधुन फवारे
रंग वेगळे घेऊन संगे
झालेत रानवेडे वारे

रंगीत स्वप्ने किती दिसांची
फुललीत हाती घेऊन हात
पसरून मऊसर गालिचा इथं
नाजूक फुलं रंगभरात

दि. २३/७/१९
दुपारी १.४५ वा.



(७६)
## फुले कागदी

फुले कागदी, रंग गुलाबी
गुलबक्षीला लाजवता
झाडावरूनी करीत कमान
सज्ज राहती सूर्य स्वागता

क्षितिजावरती रंग केशरी
तांबूस झाकी पसरून गेली
छटा सांडल्या सृष्टीकाराने
पूर्व दिशा बघ रंगीत झाली

काळे करडे डोंगर भरडे
मागून त्यांच्या रवी निघतो
प्रकाश दडवून ठेवी निशेला
उषा भेटण्या गडबडतो

ती न्हाते धुते केस झटकते
पानापानांवर दव गे
रूप तिचे प्रभात काळी
रोज वाटते नवेनवगे

तिच्या मागुनी घेत मागोवा
किरणांचा सम्राट उगवला
दाहकता सोडून कोवळा
किरणझगा घालून आला

तिला मनवण्या सोड तीव्रता
नाहीतर दूर करील ती तुला
ऐकून सल्ला कुण्या सख्याचा
प्रभाती रवी रोज सुसह्य झाला

रविबिंबाचे तेज जेवढे
दिसते प्रभाती खुललेले
कर्तव्या निघण्या आधी
उषा रूपावर भुललेले

पाठशिवणीचा खेळ दोघांचा
लपून झाडे पाहताती
करून फुलांना ते सामोरी
रंग गुलाबी फुलावरती

प्रणयवेळा सूर्य उषेच्या
भल्या पहाटे रंगून जाती
सृष्टी सारी मुखरित होऊन
मीलनगाणी आळवत गाती

दि. २३/७/१९
दु. ३:०० वा.



## (७७)
## गोड सोनचाफा

चाफ्यामध्ये चाफा
गोड सोनचाफा
सुवास त्याचा
अपूर्व जसा

रंग सोनसळी
छटा केशरी पिवळी
सुवास वाऱ्यावरी
पोचतो जळी स्थळी

किंमत त्याची कशी करावी
अनमोल ऐसा परिमळ
चाफ्यांचा राजा हा विराजे
रमणी असो वा राऊळ

सोनचाफ्याने ओंजळ भरता
गंध पसरतो चहूकडे
थांब सखे मज गजरा माळू दे
नेहमीच तुजला घाई गडे

आज माळल्या गजऱ्याचा
सुगंध राहील खूप दिवस
क्षण राहावेत असेच सुरभित
तुझे नि माझे हाच नवस

बाजारातून भटकत असता
नक्की थबकतो तिथे प्रिये
जिथे सोनचाफा हा ऐटीत
खिळवून ठेवतो सकल स्त्रिये

सोनचाफ्याची कांती असावी
स्वप्नं जसे भौतिक होते
चरित्रातुनी सुगंध वहावे
सोनचाफी अलौकिकतेचे

दि. २४/७/१९
दुपारी ४.४४ वा.



## (७८)
## मोगरा असा फुलून आला

मोगरा असा फुलून आला
ओंजळीतून भरून गेला
जमलेली सारी फुलं सांगती
क्षण असे ठेवा, ठेवा संगती

माझे फूल जसे छोटेसे असते
सुवासाने ते ओसंडू पहाते
सुखाचे क्षणही असती लहान
आनंद त्यांचा किती महान

फुलाची माझ्या दांडी धरून
नाकाशी अलगद हुंगता सौरभ
शरीरात परिमळ फिरतो
मोगरा काया, काया मोगरा होतो

फूल सुकू नये, काळजी घेता
जमेल तेवढे हळवे होता
हळुवार हाताळताना फुलांना
रिकाम्या हाताचा गंध जाणता

फूल एखादे कधी दडते वहीत
गजरा कोणाचा केसात लयीत
गळ्यात देवाच्या दुहेरी माळ
तुळशीजवळ गंधसकाळ

अत्तर होऊन मोगरा कुपीत
पूजा, सणवार, उत्सव गुपित
अंजलीतला मोगरा सर्वांगी
आत डोकवा मोगरा मर्मांगी

दि. २३/७/१९
सायं. ७.३५ वा.



## (७९)
## गुलाबपाकळ्या थाळी सजल्या

गुलाबपाकळ्या थाळी सजल्या
शुभ्रमोगरी त्यावर अवल्या
टिळयासम पिवळे फूल मधोमध
नजरसुखाचे पूर्ण प्रबंध

डोळे फिरती उगा गोल गोल
थाळीस मिळते गती
फुलाफुलातून पाट सुगंधी
आसमंती वाहती

प्रत्येक फूल, हो मशगुल
आपुल्या नादात
नाद पूजेचा ऐकुनी सुटती
नाचत राऊळात

देवापुढती ठेऊ स्थालिका
प्रसन्न चित्ताने
देव हुंगतो फूल सुगंधी
दिले जे भक्ताने

थाळी फुलांची स्वीकारून तो
गुलाब दे भाळी
मोगऱ्याच्या गंधक्षणांना
रेखीतो कपाळी

त्याच्या कृपेच्या कैक पाकळ्या
जीवन थाळीत
मधला गुलाब तो असतो की
केंद्रभागात

मन केंद्रित करता
आत्मरुप मग दिसते देवाचे
आयुष्याची थाळी फिरते
चित्त स्थिर होते

योगी सुगंधी दिव्यत्वाने
जाय अंतर्बाह्य भरून
त्रिखंडात मग काहीच नसते
ते तत्त्व राहते उरून

दि. २५/७/१९
सकाळी ७.३२ वा.



## (८०)
## फुले अळुमाळू

फुले अळुमाळू
नाजूक स्वप्नाळू
रंग पाकळ्यात सारा
वारा जीव घुटमळू

वारा सावध सावध
वाहे शांत हळूहळू
कुजबुज फुलराण्या
येई धरित्रीला कळू

होई प्रसन्न फुलांचा
दिस सकाळू सकाळू
झरा बघ गाई गाणं
वाहताना झुळू झुळू

पराग पाहताती
रुजण्याला नवस्थळू
फुलपाखरं की दूत
नेती लगडून पायतळू

बीज एका भुईतलं
जातं दूर रानमाळू
तिथं आलं आलं फूल
नव्यानं फुलनाळू

२१/१२,
१३:५६



## (८१)
## देवपूजेची तयारी

तयारी पूजेची पूजेची
देवपूजेची तयारी
फुलं आणली आणली
तोडुनिया घरी

माळ गुंफियली गुंफियली
भक्तिधाग्याने अजोड
कामक्रोधादि क्रोधादि
षड्रिपु जरा सोड

पुष्प करंडी करंडी
त्यात बागेतली फुलं
फुलं असती असती
सोबती तुळशी मंजुळ

ताटी फळांचा नैवेद्य
नैवेद्य हो तयार
देवासाठीची वस्त्रे हो
करूनिया तैयार

चंदन उगाळून उगाळून
उटी केली का सुगंधित
अष्टगंधाने गंधाने
भाळ पट्टक हो लेपीत

सोळा उपचार उपचार
केले का हो साजरे
आरती करा रे, करा रे
देव दिसती की गोजिरे

प्रसाद घ्यावा हो, घ्यावा हो
भक्ती तीर्थ प्राशून
साष्टांग नमन, नमन
देवापुढती घालून

पूजा होताच होताच
भाव प्रसन्न की झाले
मन चंदन चंदन
होऊन दरवळले

दि. २८/७/१९
दुपारी २.४५ वा.



## (८२)
## **वेगळ्या पाकळ्या**

पाकळ्या जरा
असती वेगळ्या
गुलाबी रंगाच्या
गुलाब कळ्या

फिका गुलाबी
नाव देणारा
रंग रंगीला
गुलाबफुला

पाकळी गोल
एकंच कत्र
स्पर्शात भरले
रेशीम अत्र

मंद गंधाचा
दरवळ सुटला
गुलाब माझ्या
कुंडीत फुलला

गाल गुलाबी
बाहुली नाजूक
माझी कन्यका
कळीचे रूप

तोडू हळुवार
ताटात ठेवा
देवाच्या पायी
वाहण्या न्यावा

देवघरात
दिवसभर
देव गंधित
मोहित फार

गुलाबी गुलाब
दिसे देखणा
शोभा आली बघ
त्याने अंगणा

हसावे असेच
गोड आनंदी
गुलाब पाकळ्या
रमती स्वानंदी

दि. २८/७/१९
दुपारी ४.३४ वा.



## (८३)
## गंध केवड्याचा

दूर वनी कुठे सांडला
गंध केवड्याचा
वारा घेऊन सुगंध वाही
मंद मंद त्याचा

हिरवी हिरवी पानं काटेरी
लांब सडक टोकदार
मध्ये पिवळसर पाने उगवती
कणीस केवडी अणकुचीदार

पिवळ्या पानांच्या गर्भातून
सुरभीचे घडे भरले परागी
कण कण पीत गंध वाहती
अत्तर प्रिय हे शंभूस विरागी

बन केवड्याचे सहजी न दिसते
दूर दूर अरण्यात वाढते
गंधाने घायाळ याच्या
सर्प नाग वंशावळ चढते

घालून वेढा, नागराज केवढा
बसतो तळ ठोकून
कसे काढावे, हाती घ्यावे
केवड्यास कोठून

सणावारांना देवदेवींना
असे याचाच मान
वाहू शिरावरी दुर्मिळ ऐसे
एक केवडी पान

रंग गौर वर्णिण्या कवींनी
केतकी कांती सांगितली
पराग सांडले गालावरती
वर्णछटा तनी उमटली

केतकीच्या वनी कधी
सूर तेच ओळखीचे
गंध हुंगण्यास गीत
उतरे तिथे स्वर्गीय ते

दि. २८/७/१९
रात्री ७.४७ वा.



## (८४)
## बाग जांभळी गुलाबी

बाग जांभळी गुलाबी
आकाश हे शराबी
निळ्याशार रंगातुनी
रंग पाझरे गुलाबी

गुलबक्षी गडद रंगा
फिक्या गुलाबी पाकळ्या
मिसळुनी रंग जाता
मोहात नभही पडता

पक्ष्यास झेप घेणे
वाटे किती सुहाने
पंखास पसरूनिया
रंगास भेट देणे

नीलवर्ण नीलाक्षी
अंबरास साजेशी
धरती गुलाबी वेडी
गुलकांती घेत वक्षी

रंग रंग नसती केवळ
ते भावनांची भाषा
नीलवर्ण मेघकृष्ण
राधाही सुमनवेशा

दि. २८/७/१९
रात्री ८.१७ वा.



## (८५)
## कदंब वृक्ष

कदंब वृक्ष हे असती पुरातन
फुले गेंद गोल गोल
पिवळसर पांढुरक्या छटांची
फुले ठरती अनमोल

ग्राम्य नाव याचे ‘निवं’असते
फूल हेच फळही ठरते
गोल गोल कंदुकी सृष्टी बघ
मंद गंध ओतप्रोत भरते

गरगरीत गोलाकार फुले
त्यात असंख्य दिसती पाकळ्या
केंद्रातून त्या बाहेर डोकवीत
अगणित भासती मृदुकळ्या

संस्कृत साहित्यातून याची
जडली नाळ सौंदर्याशी
स्वरूप सुंदरी रमणी कोणी
मदिराचूळ भरी याच्या तळाशी

तदनंतर हा वृक्ष बहरतो
वाट पाहतो रमणीची
ती रमणी लावण्यवतीही
रूपछबी ऋतुराणीची

ती नसली तर कदंब रुसतो
गाल फुगवूनी तसाच बसतो
वसंत येतो तरी ना उमलतो
प्रियकरांना उगाच छळतो

मदिराक्षीच्या धुंद चुळांनी
पानोपानी फुले डोकवती
कदंब फुलला, कदंब फुलला
रानीवनी उत्सव भरती

कात्यायनी व्रत प्रसंग यमुनी
स्नानास उतरल्या गोपी
कदंबवृक्षावरी तयांची
वस्त्रे हरीने लपविली

राधेसंगे रमला सदैव
कदंबवनी नित श्रीरंग
खेळ खेळला अगम्य प्रेमिक
दंग दंगला मोहून कदंब

कृष्णगोपिका कदंब तरूशी
फेर धरुनी या नाचत गाती
वृंदावनी मग रास रंगते
कदंबपुष्पे गोपी होती

कृष्णतरुशी लगडून जाती
कृष्णतरुशी लगडून जाती

दि. २९/७/१९
सकाळी ९.१७ वा.



## (८६)
## कलश फुलांचा

कलश फुलांचा सांडो अंगणी
जीवन फुलून जावे
सात्विक पूजा होऊन मनीचे
भाव भरभरून यावे

सजावटीचे सुंदर चित्र मज
घरी रेखता यावे
त्या चित्राला रंग वेगळे
मलाच भरता यावे

भिंती भिंती फुलफुलासम
हळव्या नाजूक व्हाव्या
छतावरून तर सुखवेली ह्या
घरामधे डोकवाव्या

ब्रह्मस्थानी कलश तांब्याचा
ओसंडून की जावा
आत्ममोगरी सुवास त्याचा
ब्रह्मानंदी न्यावा

घर फुलांचे दार फुलांचे
माणूस हळवा व्हावा
पाषाणासम कठोरभाव
त्याने मग टाळावा

क्षणा क्षणाचे जीवन असू दे
प्रफुल्ल ताजेतवाने
कशास दीर्घायुष्य असावे
कोमेजून ते जाणे

फुलफुलातून मला हसू दे
पाकळीतुनी वसू दे
अंतर्भागी गंध राहू दे
सुगंध मज होऊ दे

दि. २९/७/१९
रात्री ७.४९ वा.



## (८७)
## नाजूकशी फुले

नाजूकशी फुले
बसली जवळजवळी
एक फुलपाखरू की
आले हो सकाळी

ताटामध्ये निवांतशा
बसल्या फुलसख्या
शुभ्र मोहक कवळ्या
त्यांच्या की पाकळ्या

छटा निळ्या जांभळ्या
न नक्षीदार काळ्या
ठिपकेदार पाखरू की
फुलास पडती वळ्या

तेही रस चाखतसे
न हलता डुलता
डोळे त्याचे पाहताती
मान न वळता

किती वेळ तसेच ते
फुलांवर बसे
रसपान करताच
खुदकन हसे

म्हणे मी जातो आता
सांगत वनाला
फुलं तिथं उमलली
पत्ता ना कुणाला

कित्ती गोड मधुर असे
रस अंतरंगी
दिसती साधीसुधी फुले
शुभ्र वरपांगी

मी भेटलो तयांना
ती लाजाळू मुलखाची
स्पर्श झाला माझा नि
सवय त्यांची अंग चोरण्याची

मी हसलो आणि गाली
त्यांच्या उमटली लाली
फुलं गोड गोड पहावं त्यांना
रम्यशा सकाळी

दि. ३०/७/१९
सकाळी १०.१० वा.



## (८८)
## कळया सकाळी मोगऱ्याच्या

कळ्या सकाळी मोगऱ्याच्या
येऊन बसती थाळी
कधी न सुकती गंध पसरती
अंगणी रानोमाळी

आठवणींचा गुच्छ न त्याचा
गजराच विणावा लागे
स्नेहधाग्याने ओवून त्याला
अवलीत बांधावे लागे

दोन मोगरे देठ जोडले
दिशा दोन बहरल्या
सुई टोचली तरी ना कळली
वेड्या मोगऱ्याला

दिसते त्याला तिच्या जवळचे
केशकुंतली रमणे
अन रमणाच्या हातून तेथे
माळून स्वत:स घेणे

तिच्या अंगच्या गंधकळ्यांना
हुंगून टिपून घेणे
सुवास भरता तनामनातून
स्मृतिकोश मोगरा होणे

केशकलापी गप्पा रंगती
कुंतल, मोगऱ्याच्या
केश सांगती भावकथा
बघ तिच्या रोमरोमीच्या

एक गजरा तिने दडविला
आपुल्या उदरात
सुगन्ध देईल तिला सारखा
राहील तो भरात

असा मोगरा होऊन गजरा
तिच्या वेलीवरती
फुले उमलती गूढ सांगती
आयुष्या भरती

दि. २९/७/१९
रात्री ८.१७ वा.



## (८९)
## जुईचा वेल

जुईचा वेल माझ्या
अंगणी हसला
फुलांचा सडा मग
पडताना दिसला

फुलंच फुलं
चहूकडे
सुगंधी कट्टे
झालेत गडे

वेचायला मन माझं
धावत सुटतं
मनाची करंडी
व्हावंसं वाटतं

सोडून सारा
कामांचा व्याप
जुईला वेचणं
खुशाल अमाप

तिला वेचता
मन हळवे होते
नाजूक भावना
भरते येते

भरते माझी
पदर झोळी
करंडी वाहते
जुईदार कळी

नकळत येते
गजऱ्याची लहर
जुईच्या फुलांची
धाग्यातली सफर

एकामागे एक
फुलं धाग्यात गुंफली
गजऱ्याची प्रतीक्षा
लगेच संपली

केसात माळला
गजरा सख्याने
नजरेत गर्दी
केलीय धुक्याने

जुईसम आसवं
गंधित झालीत
आनंदानं वेलीवर
डुलायला गेलीत

जुईराणी जुईराणी
वेलीवर झुल
पडू दे तुलाही
वाऱ्याची भुल

तुझाच गजरा
आठवण होईल
सोनेरी क्षणांची
साठवण होईल

दि. ३१/७/१९
रात्री ९.१५ वा.



## (९०)
## प्राजक्ताचा सडा

प्राजक्ताचा सडा भुईवर
हसरी हसरी फुले
बाळतान्हुली जैसी नाजूक
कोमल काया खुले

रंग पांढरा केसर देठी
गंधासाठी उभा जगजेठी
स्वर्गामधले फूल अवतरे
सत्यभामेच्या हट्टासाठी

बीज आणिले हरीने येथे
अंगणी भरला वृक्ष दिव्यसा
भामा पाहे वाट फुलांची
अवचित झुकला तो शेजारी

नशिबी असतील तरंच मिळतील
फुले पारिजातकी सानुली
रुख्मिणीने ना मागितले तरी
ओंजळ तिची बघ भरून गेली

हरी सांगतो रहस्य भामे
ऐक तुला गं कळले नाही
ईर्षा वसता मनास जाळी
फुले कुठून मग येतील भाळी

आस न धरली त्या राणीने
मनात मजला मागितले
मी मग झाड होऊन प्राजक्ती
देह इथे, तिज फूल वाहिले

मजला मिळवणे नाही सोपे
सारे समर्पित करशील श्रद्धे
पारिजातका घेशी ओंजळी
मी मग परिमळ देत ओघळे

घट्ट पकडूनी ठेवीशी कोंडुनी
जीव माझा नाजुक गुदमरे
मला मनातून साठवून तू
मुक्त सोडता मी अजून फुले

म्हणून मी, अजूनही न साहतो
उष्ण उसासे भामेचे
हाती न ठेवा अधिककाळ मज
जीव कोमेजून जगणे सुकणे

असा मी नाजुक, भक्ती पाहुनी
अंत:करणी परिमळतो
प्राजक्ताची फुले होऊनी
रुक्मिणीसाठी तळमळतो

दि. ३०/७/१९
सकाळी १०.२३ वा.



## (९१)
## सूर्यविकासी कमळं

सूर्यविकासी कमळं फुलली
पहाट कमलदलातून डुलली

सोनसळी त्या उन्हात कमले
रंग सोनेरी लेऊन आली

प्रसन्न चित्ते प्रसन्न परिसर
प्रसन्न सारे सरोवर दिसते

उमलून आल्या पाकळ्यातुनी
हरिलक्ष्मी मधुरतम हासते

दिनमणी उदयाचली उगवता
एक प्रेरणा घेऊन येतो

प्राचीवरती चित्र सोनेरी
रोज सकाळी रेखून जातो

दि. १/९/१९
सकाळी ७.२३ वा.



## (९२)
## मोगरा, जाईजुई वा

मोगरा, जाईजुई वा
सायली की ती अबोली
प्रेम ते गुंफताच सूत्री
गजरा गंधित होतो गात्री

विणता दोऱ्यात प्रेम तुझे
नाजूक फुलेही होती तुझी
तुझ्याच केशी सजण्यासाठी
आस नेसून उभी केव्हाची

सखी हा गजरा
हृदय माझे
माळतो गंधाने
भरून गेले

हातात गुंफली फुले सांगती
गजऱ्यात तू दिसे गोजिरी
लज्जा तुझ्या डोळ्यातून सांडते
फुलांशी तू गोड चाळा मांडते

तू हसशी मंद, पसरे लाली
गजरा हसतो खुदकन गाली
मी चुंबून घ्यावे ऐशा क्षणांना
माळल्या गजऱ्या की प्रेमनजरा

खुलते तुझे रुपलावण्य
परिमळ भर जीवनगंध
गजऱ्यात सखी अजून धुंद
मलाही तिचा तो गजरी छंद

आठव प्रिये, क्षण दोघांचे
प्रेम गजरा जाणे दोघांचे
सहजीवन त्याने भारले
गजरी प्रियेला सदा स्मरले

गजरा माझा जीव आहे गं
तुझ्यात गुंतला तोही जसा गं
तुला सुखाचे मोगरी क्षण
देऊन सुकणे सार्थक जाण

किती प्रसंग, छटा प्रेमाच्या
गजऱ्यात मी ओवल्या ज्या ज्या
तुही अजून टवटवीत
प्रिये घायाळ मनपाकळ्या

प्रथम पाहता विरघळलो
आजही तसाच तळमळलो
तू लाजून माझा जीव घेतला
घालमेल सांगू कशी गं तुला

नजर माझ्याऽऽवर रोखशी
गजरा दिलाऽऽऽवर फेकशी
हाय मी वेडा पुन्हा पुन्हा अन
तू काही न झाल्याच्या जणू आवेशी

मी तुझाच प्रिये तुझाच राहीन
गजरा होऊन तुलाच पाहीन
तुझ्या गंधाने भारून जाऊन
पुन्हा पुन्हा मी नवा होईन

दि. १/१२/१९
सकाळी १० ५८ वा.




## (९३)
## सडे प्राजक्ताचे

सडे प्राजक्ताचे
श्रावणी चौघडे
नि:शब्द झडती ते
गंध चहूकडे

खाली दुर्वांकुरे
त्यावर लाडिक
प्राजक्ताची
गोडुली लेकुरे

अलगद झेलीत
गवत डुलते
पारिजातक वेडे
पुन्हा फुलते

प्रात:काळी
फुले वेचण्या
रसिक चालती
हाती करंड्या

सडा पाहुनी
प्रसन्न मन बघ
हळुवार वेचणे
त्यांना अलगद

शुभ्र फुलांच्या
चक्री पाकळ्या
देठी केशर
गंध वाहत्या

त्यांना वेचणे
परमसुख
सुगंध ओंजळी
आपसुक

श्रावणराजा
दौडत आला
फुलाफुलांचा
रथ हो त्याचा

स्वागतास रेखु
प्राजक्त गणेशा
सुरभित त्यासम
कर जीवन ईशा

दि. १/८/१९
सकाळी ६.४२ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.** **(https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/ सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्यायः, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (तिच्यावरील प्रीत कविता) - नादश्रुती, श्वेता, (सकाळ-संध्याकाळ) - लाघव वेळा, (वेळा) - तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, (फुले) - सुरभी, (पशु) - खाणाखुणा, (पक्षी) - वैष्णवी, (स्त्रीजीवन) - स्वामिनी, मृणालिनी, (धरती-आकाश) - प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utmsource=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=1266533350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ५९
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ४४
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •